


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २७२ ■ शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## आरटीई : ११ ते २० एप्रिलदरम्यान प्रवेश निश्चितीचे आवाहन

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अकोला :** आरटीई २००९ नुसार वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई २५ टक्के ऑनलाइन प्रवेशाची सोडत ६ एप्रिल २०२६ रोजी काढण्यात आली असून निवड यादी जाहीर करण्यात आली आहे. ११ ते २० एप्रिलदरम्यान प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

# वारकरी संप्रदायात प्रतिगामी लोकांची घुसखोरी – शरद पवार

## समता, प्रबोधनाऐवजी धर्मांध शक्तींना बळ देणारी मांडणी सुरु

प्रतिनिधी ११ एप्रिल

**मुंबई :** शरद पवार यांनी वारकरी संप्रदायाबाबत महत्त्वपूर्ण आणि चर्चेत येईल असे विधान केले आहे. महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेल्या स्मरणिकेत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांची घुसखोरी होत असल्याचा आरोप त्यांनी केला असून, या प्रवृत्तीमुळे चळवळीचा मूळ प्रबोधनात्मक हेतू धोक्यात येत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय साहित्य संमेलन या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या लेखात पवार यांनी वारकरी परंपरेतील बदलत्या प्रवाहांवर भाष्य केले. त्यांच्या मते, या संप्रदायातील सुमारे ६० टक्के लोकांची मांडणी धर्मांध शक्तींना बळ देणारी होत आहे. समतेचा आणि प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या वारकरी चळवळीमध्ये अशा विचारांची वाढ होणे ही चिंताजनक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, या पार्श्वभूमीवर काही पुरोगामी विचार मांडणाऱ्या व्यक्तींची नोंद घेण्याचे काम सुरू केले आहे. सध्या सुमारे चाळीस जण असे दिसून येतात की



जे कीर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून प्रगत विचार मांडत आहेत. अशा लोकांची संख्या वाढणे आवश्यक असून, समाजप्रबोधनासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

याचवेळी पवार यांनी वारकरी चळवळीत महिलांचा अभाव असल्याची खंतही व्यक्त केली. प्रबोधनाच्या या प्रवाहात महिलांचा सहभाग फारसा दिसत नाही, ही बाब त्यांनी दुर्दैवी असल्याचे म्हटले. समाजातील सर्व घटकांचा समतोल सहभाग असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सूचित केले.दरम्यान, या संमेलनाचे उद्घाटन देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, देशभरातील महिला शासकीय अधिकारी या कार्यक्रमात सहभागी होत आहेत. या निमित्ताने सामाजिक, सांस्कृतिक आणि धोरणात्मक मुद्द्यांवर चर्चा होत असून, त्यात वारकरी संप्रदायावरील पवार यांच्या विधानामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### इफ्तार पार्टीत सहभागी होता तेव्हा - तुषार भोसले

भाजपच्या अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख तुषार भोसले यांनी शरद पवार यांच्या या वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत जोरदार हल्लाबोल केला. वारकरी संप्रदाय आणि हिंदू धर्मावर टीका करणाऱ्यांना हा संप्रदाय धर्मांध वाटतो, हे दुर्दैवी असल्याचे त्यांनी म्हटले. ज्या लोकांसोबत इफ्तार पार्टीत सहभागी होता, तेव्हा धर्मांधता दिसत नाही; पण राम कृष्ण हरी आणि ज्ञानोबा तुकोबाचा गजर करणाऱ्या वारकरी संप्रदायावर आरोप केले जातात, असे म्हणत त्यांनी संताप व्यक्त केला. वारकरी परंपरा ही सामाजिक समतेचा संदेश देणारी असून तिची बदनामी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. याशिवाय, तुषार भोसले यांनी पवारांवर गंभीर आरोप करत म्हटले की, वारकरी संप्रदायाला हिंदू धर्मापासून वेगळं करण्यासाठी वर्षानुवर्षे कारस्थानं रचली जात आहेत. काही लोकांची यादी तयार करून संप्रदायात फूट पाडण्याचा प्रयत्न होत असल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, अशा कोणत्याही षडयंत्राला आपण यशस्वी होऊ देणार नाही, असा इशारा देत त्यांनी वारकरी परंपरेचे रक्षण करण्याची भूमिका ठामपणे मांडली

# एन आर एच एम ची चौकशी मॅनेज झाल्याची चर्चा

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अकोला :** एन आर एच एम च्या जिल्हा लेखा व्यवस्थापक दीपल मलखेडे यांच्या विरोधात आठ पानांची तक्रार असताना आणि त्यावर १८० लोकांच्या सह्या असताना त्या सह्या आणि तक्रार वेगवेगळ असल्याचा दावा तपास अधिकारी स्वतःच करत असल्याचे चित्र असून या चौकशी समितीची चौकशी राज्य सरकारने करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

### वेतन व इतर तक्रारी दाबण्याचा प्रयत्न झाला सुरु

जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाच्या अनागोंदी कारभारात आता एन आर एच एम ने भर घातली आहे. नियुक्तीचा आदेश नसताना अनेक अधिकारी आणि कर्मचारी काम करत असून ते शासनासाठी काम करत आहे की वसुलीसाठी असा प्रश्न उपस्थित होतो. आठ पानांची तक्रार असताना तक्रार व सह्यांचा कागद वेगळा असल्याचा दावा खुद्द तपास अधिकारी करत असल्याने चौकशी समिती मॅनेज झाल्याची ओरड तक्रारकर्ता करत आहे. जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय आरोग्य अभियानात मोठा गैरप्रकार असल्याची तक्रार असताना चौकशी अधिकारी मात्र सर्व सुरळीत असल्याचे सांगत होते.

# जुन्या वादातून युवकाची नृशंस हत्या... हत्या केल्यानंतर युवकाचा हातात चाकू घेऊन हैदोस

- दोन दिवसात दोन हत्या जिल्हा हादरला
- अकोला शहरा जवळील शिवनी येथील घटना
- दोन्ही आरोपींना रेल्वे स्टेशनवर सिनेस्टाईल अटक

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अकोला :** पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार शुक्रवारी रात्री साडे अकराच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली. शिवनी परिसरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात हा हल्ला झाला. मृत युवकाचे नाव अभय रवींद्र गवई आहे. अभय जेवण करून घराबाहेर पडला असता परिसरातील पंचशील किराणा दुकानाजवळ दोघा तिघांनी चाकूने हल्ला केला. गंभीर जखमी अवस्थेत तो घरी पोहोचण्याचा प्रयत्न करत असताना पोटात व पाठीवर झालेल्या वारामुळे त्याचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. दरम्यान मृतक युवकाचे वडील रवींद्र गवई यांनी आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी केली. अन्यथा त्याच्यावर अंत्यसंस्कार न करण्याचा इशाराही त्यांनी दिला. घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. जुन्या वादातून आरोपी बहुजन नगर निवासी अयोग जीवन सावद आणि राहुल नगर शिवनी निवासी गणेश सोनी यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून अभिषेक वर चाकूने हल्ला करून गंभीर जखमी केल्याने अभिषेक चा मृत्यू झाला. चाकूने वार केल्यानंतरही आरोपी अयोग सावद याने हातात चाकू घेऊन उपस्थित नागरिकांना धमकावल्याचा तसेच हैदोस घालण्याचा प्रयत्न केला. हे दोन्ही आरोपी वीस वर्षे वयाचे असल्याची माहिती मिळत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आरोपींना अटक करण्याच्या कामी रवाना झाले होते. सदर पथकाने तांत्रिक



मृतक आरोपी

विश्लेषण व मिळालेल्या गुप्त बातमीदाराच्या माहितीवरून आरोपी हे रेल्वेने फरार होण्याच्या तयारीत असल्याबाबत माहिती मिळताच पथक रेल्वे स्टेशन परिसरात पोहोचले. त्या ठिकाणी बाहेरगावी पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपी नामे अयोग जीवन सावद व गणेश सोनी यांना अटक केली. आधी पोलिसांना पाहताच आरोपींनी पळून चालत्या रेल्वेमध्ये बसण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्या. आरोपींना नमूद गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्यांनी सदर मृतकाचा खून हा जुन्या भांडणाच्या कारणावरून केल्याचे सांगितले. आरोपींना पुढील कारवाईसाठी पोलीस स्टेशन एमआयडीसी अकोला यांच्या ताब्यात देण्यात आले असून, पुढील तपास पोलीस स्टेशन एमआयडीसी करीत आहे.

### शहरात दादागिरी व भाईगिरी करणाऱ्या अल्पवयीन मुलांच्या टोळ्या

शहरात दोन दिवसात दोन हत्या झाल्याने जिल्हा हादरला आहे गुरुवारी घरगुती वादातून पतीने धारदार शस्त्राने पत्नीची हत्या केल्याची घटना यावलखेड येथे घडली होती. या घटनेची शाई सुकत नाही तोच शुक्रवारी रात्री शिवनी परिसरात जुन्या भांडणाच्या वादातून ही घटना घडली. शहरात बेरोजगारी वाढल्याने अनेक अल्पवयीन मुलांच्या टोळ्या निर्माण झाल्या आहेत. दादागिरी व भाईगिरी करणे, चाकूच्या धाकांवर लूटमार करणे, युवतींची छेडखानी करणे, ट्रिपल सीट वाहन जोरात पळविणे, रस्त्यावर रात्री वाढदिवस साजरा करून फटाके फोडणे, रस्त्यावरच दारू व गांजाचे सेवन करणे आदी घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. पालकही आपल्या मुलांकडे दुर्लक्ष करीत आहेत. उलट काही पालकांना तर आपल्या मुलाची दादागिरी पाहून अभिमानाने उर भरून येतो. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी एखाद्या नागरिकाला चाकू चा धक्का जरी लागला तरी त्या आरोपीस असा धडा शिकवू की त्याच्या सात पिढ्या लक्षात ठेवतील असा इशारा दिल्यावरही शहरात अल्पवयीन युवकांच्या टोळ्या पोलिसांनाही जुमानत नसल्याचे दिसून येत आहे हे पाहता पोलिसांनी अशा टोळ्यांना वठणीवर आणावे अशी मागणी नागरिक करीत आहेत

## सायबर गुन्हेगारांनी लाटलेले ३८ लाख ग्राहकाला बँकेने परत देण्याचा आदेश

प्रतिनिधी ११ एप्रिल


**मुंबई :** सायबर गुन्हेगारांकडून नागरिकांच्या बँक खात्यांचा गैरवापर करून त्यांचे पैसे लाटण्याचे प्रकार वाढीस लागले असताना मुंबई उच्च न्यायालयाने एका प्रकरणात महत्त्वाचा आदेश दिला आहे. पुण्यात व्यावसायिक असलेल्या बँक खातेदाराची कोणतीही चूक नसताना बँक खात्यातील त्याचे तब्बल ३८ लाख चार हजार रुपये सायबर गुन्हेगारांनी अन्य खात्यांत वळवून त्याला लुबाडल्याची गंभीर दखल घेत, ते पैसे व्यावसायिकाला देण्याचा आदेश न्यायालयाने एचडीएफसी बँकेला दिला आहे. खातेदाराची कोणतीही चूक नसताना त्याला त्याच्या स्वत:च्या पैशांपासून पाच वर्षांहून अधिक काळपासून वंचित राहावे लागले आहे. त्यामुळे आठ आठवड्यांत ही रक्कम वार्षिक सहा टक्के व्याजासह परत करावेत. अन्यथा, त्या रकमेवर आठ टक्के व्याजदर लागू होईल', असे न्या. भारती डांगरे व न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले आहे.

# वाशिम, यवतमाळसह हिंगोली, परभणी, नांदेडला भूकंपाचे धक्के !

## ♦ घरावरचे पत्रे हलले, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अकोला :** अकोला जिल्ह्यालगत असलेल्या वाशिम जिल्ह्यासह यवतमाळ व मराठवाड्यातील हिंगोली, परभणी, नांदेडमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के बसल्याची माहिती आहे. तर काही ठिकाणी भूकंपाची तीव्रता जास्त असल्याने घरांच्या भितींना तडे गेले असून घरावरील पत्रे हलल्याचीही घटना घडली आहे. अचानक सौम्य धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये भीतीच वातावरण पसरले. ही घटना शनिवार, ११ एप्रिलला सकाळी ८ वाजून ४६ मिनिटांनी घडल्याची प्राथमिक माहिती आहे.हिंगोली जिल्ह्यांमध्ये आज सकाळी ८ वाजून ४७ मिनिटांच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहेत. हिंगोली जिल्ह्यांमध्ये दरवेळेस भूकंपाचे धक्के जाणवत





असतात. मात्र यावेळेसचा भूकंपाचा धक्का ४.७ रिश्टर स्केल एवढ्या मोठ्या प्रमाणात असल्याचे नागरिक सांगत आहेत. भूकंपाचा धक्का जाणवल्यानंतर अनेक गावातील घरामध्ये ठेवलेली भांडी आणि वस्तू जमिनीवर कोसळून पडल्या आहेत. तर अनेकांच्या घराला तडे गेल्याची सुद्धा प्राथमिक माहिती समोर आली आहे. हा भूकंपाचा धक्का हिंगोली जिल्ह्यासह नांदेड, परभणी या जिल्ह्यांना सुद्धा मोठ्या प्रमाणात जाणवलेला आहे. तर वाशिमात धक्के सौम्य प्रमाणात होते. दुसरीकडे, नांदेडमध्ये देखील भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहे.

शहरातील सिडको, वजीराबाद, आनंद नगर, तरोडा सांगावी भागात हे धक्के प्रकर्षाने जाणवले आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यात शेबाळपिंपरी भागात भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहे. ८ वाजून ४५ मिनिटाने हा धक्का जाणवला आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

## काकाचा अल्पवयीन पुतणीवर अत्याचार; २५ वर्ष तुरुंगवास

**पुणे :** वडिलांनी आईचा खून केल्यामुळे पोरकी होऊन मावशीकडे राहणाऱ्या दहा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम काकाला पुण्याच्या विशेष न्यायालयाने २५ वर्षे सक्तमजुरी आणि एक लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली. या प्रकरणात तक्रारदार असलेल्या मावशीने खटल्याच्या सुनावणीदरम्यान साक्ष फिरविली असली, तरी तिनेच केलेल्या मोबाइलमधील चित्रीकरणात या गुन्ह्याला वाचा फुटली होती. त्या आधारे विशेष न्यायाधीश एच. एम. भोसले यांनी आरोपीला शिक्षा ठोठावली.




CMYK CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## दुहेरी हत्याकांडातील पाच आरोपींचा जामीन फेटाळला

**हिवरखेड:** येथील दोन भावंडे फाजील बेग आणि नाजीम बेग हे आपल्या पित्यासह धारणीच्या दाना बाजार येथे असताना तेथे अनेक आरोपींनी संगणमत करून त्यांच्यावर दि ५/१०/२०२५ रोजी प्राण घातक हल्ला केला होता. त्यामध्ये मोठा भाऊ फाजील बेग (वय २९) हा जागीच ठार झाला होता. तर लहान भाऊ नाजीम बेग (वय २५) याचा अकोल्यातील रुग्णालयात उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला होता.

याप्रकरणी धारणी पोलिसांनी एकूण १६ आरोपींवर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करून अटक केली होती. सदर जघण्य हत्याकांड संपूर्ण महाराष्ट्र भर गाजले होते. सदर हत्याकांडातील आरोपी शेख शाहरुख शेख रोशन, शेख फारूक उर्फ फन्ना शेख रोशन, शेख नदिमोदीन शेख काजिमोदीन, नदीम खा नियामत खा, शेख अझहरोदीन शेख अजिमोदिन, सर्व राहणार हिवरखेड रुपराव. अतिरिक्त सत्र न्यायालय अचलपूर येथे जामीनासाठी अर्ज केला होता. सदर अर्जावर ६ एप्रिल २०२६ रोजी सुनावणी झाल्यावर अतिरिक्त सत्र न्यायाधीश सागर पाटील यांनी पाचही आरोपींचे जामीन अर्ज फेटाळले.

# अकोटमध्ये प्रेमपत्राचं अनोखं प्रदर्शन ; वऱ्हाडी साहित्य संमेलनाचे आकर्षण

वि. प्रतिनिधी ११ एप्रिल

**अकोट :** सातव्या अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने अकोटमध्ये 'माझ्या प्रेमपत्रांच्या दुनियेत' या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, गोपाल वसंतराव खाडे यांच्या अतरंगी प्रेमपत्रांच्या संग्रहाचे प्रदर्शन १२ एप्रिल रोजी

श्री क्षेत्र श्रध्दासागर ज्ञानपीठ, दर्यापूर रोड, अकोट येथे भरविण्यात येणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे प्रदर्शन सर्व साहित्यप्रेमींसाठी खुले राहणार आहे. प्रेमपत्र म्हणजे केवळ प्रियकर-प्रेयसीतील संवाद नसून विविध नात्यांतील जिव्हाळा, आपुलकी आणि भावनांचे प्रभावी माध्यम आहे, याचा प्रत्यय या प्रदर्शनातून



येतो. शेतीतील अपयशामुळे खचलेल्या भावाला बहिणीने लिहिलेले सांत्वनपर पत्र असो किंवा नात्यांमधील भावनिक अभिव्यक्ती दर्शविणारे शब्द—अशा अनेक पैलूंनी हा संग्रह समृद्ध झाला आहे.

वाशिम जिल्ह्यातील कारंजा येथील शिक्षक गोपाल खाडे यांना साहित्याची विशेष आवड असून, विविध प्रकारची प्रेमपत्रे गोळा करण्याचा त्यांचा आगळावेगळा छंद आहे. मासिके, साप्ताहिके, पुस्तके आणि वर्तमानपत्रांमधून त्यांनी अनेक वर्षांपासून हा संग्रह जतन केला आहे.

या प्रदर्शनात कॉलेजवयीन तरुण-तरुणी, पती-पत्नी, भाऊ-बहिण अशा विविध नात्यांतील छापील प्रेमपत्रांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, पत्र लिहिणाऱ्यांच्या व्यवसायानुसार भाषाशैलीत होणारे बदलही यातून दिसून येतात. काही पत्रांमध्ये वऱ्हाडी बोलीचा गोडवा अनुभवायला मिळतो, तर काहींमध्ये वैद्यकीय संज्ञांचा वापरही आढळतो. मोबाईल, व्हॉट्सॲप, फेसबुक यांसारख्या आधुनिक माध्यमांचा प्रसार होण्यापूर्वी लोक आपल्या भावना कशा व्यक्त करत होते, याची ओळख नव्या पिढीला व्हावी आणि प्रेमपत्रांची जादू अनुभवता यावी, या उद्देशाने हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. आजच्या सोशल मीडियाच्या युगात हरवत चाललेली शब्दांद्वारे मन जिंकण्याची कला या माध्यमातून पुन्हा अनुभवता येणार आहे. या संग्रहातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना उद्देशून लिहिलेली पत्रे. तसेच वऱ्हाडी भाषेतील प्रेमपत्रांचा स्वतंत्र विभागही रसिकांचे विशेष लक्ष वेधून घेणार आहे.

# शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांना अभिवादन

प्रतिनिधी ११ एप्रिल

## श्री शिवाजी विद्यालयात ६१ वी पुण्यतिथी साजरी

**अकोला:** लोकमहर्षी, शिक्षणमहर्षी आणि कृषीमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची ६१ वी पुण्यतिथी आज, १० एप्रिल रोजी श्री शिवाजी विद्यालय शहर शाखा, अकोला येथे अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात भाऊसाहेबांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे शाळा तपासणी अधिकारी प्रकाश अंधारे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ व्याख्याते प्रा. अभय तायडे, अकोला जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या नवनिर्वाचित संचालिका अपर्णाताई धोत्रे, लिनेन्स क्लबच्या प्रांताध्यक्षा कल्पनाताई देशमुख आणि शाळेचे मुख्याध्यापक मनोज देशमुख यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते संस्थेच्या ध्वजाचे आरोहण करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्यांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात भाऊसाहेबांना आदरांजली वाहणाऱ्या 'हे लोक महर्षी युगपथदर्शी...' या गीताने झाली.



मुख्याध्यापक मनोज देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविकातून भाऊसाहेबांच्या कार्याचा आढावा घेतला. अपर्णाताई धोत्रे यांनी संस्कृत सुभाषितांच्या माध्यमातून शिक्षणाचे मानवी जीवनातील महत्त्व विशद केले. कल्पनाताई देशमुख यांनी भाऊसाहेबांच्या जीवनातील प्रेरक प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.प्रा. अभय तायडे यांनी भाऊसाहेबांचे इतर समाजसुधारकांशी असलेले सलोख्याचे संबंध आणि त्यांचे सामाजिक योगदान यावर प्रकाश टाकला.अध्यक्षीय भाषणात प्रकाश अंधारे यांनी विद्यार्थ्यांनी भाऊसाहेबांनी दाखवलेल्या शिक्षण मार्गावर चालून प्रगती करण्याचे आवाहन केले.

भाऊसाहेबांच्या जीवन चरित्रावर आधारित घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धेचा निकाल याप्रसंगी जाहीर करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. विजेत्या विद्यार्थ्यांमध्ये विशाखा कसबे, श्रावणी आठवले, आराध्या इंगळे,निशा जाधव, अक्षरा इंगळे, सीमा शेजुळ यांनी बाजी मारली. अक्षरा इंगळे हिने भाऊसाहेबांविषयी व्यक्त केलेल्या उत्कृष्ट मनोगतासाठी तिला विशेष प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. या स्पर्धेचा निकाल ज्येष्ठ शिक्षक आदरणीय तायडे सर यांनी घोषित केला. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन शितल मोरे मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या धान्याला फक्त हमी भाव द्या

प्रतिनिधी ११ एप्रिल

## ♦ भारत कृषक समाजाची शासनाकडे मागणी

**अकोला :** अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांसाठी राज्य सरकार, केंद्र सरकार अनेक योजनांची घोषणा करते. हजारो कोटीच्या वेगवेगळया कामांना मंजूरी देते. शेतकऱ्यांसाठी सर्वात महत्वाची हमी भावाची मागणी याबद्दल कोणीच काही बोलत नाही. शेतकऱ्यांच्या धान्याला फक्त हमी भाव द्या, अशी मागणी भारत कृषक समाजाकडून डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात करण्यात आली.

शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी लागणाऱ्या प्रत्येक वस्तुची मजुरीची किंमत दरवेळेस वाढत असते परंतु त्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या मालाला कधीच वाढीव भाव मिळत नाही. त्याला आपला माल कमी किंमतीत विकावा लागतो. त्याला या बाबतीत



कुठल्याही सरकारचे संरक्षण मिळत नाही. हमी भावाबद्दल कोणीच काही बोलत नाही. वर्षानुवर्षे शेतकरी घाटयातच शेती करीत आहे. म्हणून आता सरकारने शेतकऱ्यांसाठी त्यांच्या प्रत्येक पिकाला हमी भावाची गॅरंटी द्यावी अशी मागणीही भारत कृषक समाज महाराष्ट्राच्या बैठकीत उपस्थित सदस्यांनी केली. तेव्हा चेअरमन डॉ. प्रकाश मानकर यांनी याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री, महसुल मंत्री व कृषी मंत्री यांना पाठवून त्याचा पाठपुरावा करण्याचे अश्वासन दिले. उपस्थित सदस्य शेषराव पाटील चिखलीकर, राजेन्द्र माहोरे, डॉ. सुधीश पाटील, डॉ. किरण ठाकरे, दिलीप पाटील, अनिल चतरकर, श्रीकृष्ण गावंडे, वासुदेव गावंडे, माधव भारसाकळे, सारंग बढे, या सर्वांनी भाऊसाहेबांच्या फोटोला हारार्पण करून अभिवादन केले.

# रहदारीच्या मार्गावरील अतिक्रमण काढा

प्रतिनिधी ११ एप्रिल

## प्रशांत भोपळे यांचे नगरपरिषदेला निवेदन

**हिवरखेड:** येथील सामाजिक कार्यकर्ते प्रशांत भोपळे यांनी लेखी अर्जाद्वारे गावातील मेनरोड, चंडिका चौक, नगरपरिषदजवळील हिवरखेड शाळा बसस्थानक जवळील अतिक्रमण काढावे, अशी मागणी केली आहे.

अतिक्रमणमुळे पायी चालणाऱ्या नागरिकांना मोठी तारेवरची कसरत करून चालावे लागते. शाळा कॉलेज मध्ये जाणाऱ्या विद्यार्थांना शाळेत जाण्यास विलंब होतो, गावातील मुख्य मार्केट मोठी असून दररोज मोठ मोठी वाहने व्यापाऱ्याच्या मालगाड्या खाली करायला येतात, स्त्यावर ट्रॉफिक जाम होतो, येणाऱ्या जाणाऱ्या



मोटारसायकली, तसेच रस्त्यावर मोकाट जनावरे सुद्धा आढळून येतात यामुळे अधिकच जास्त गर्दीचे प्रमाण वाढते, असेच जर चालत राहिले तर अतिक्रमण धारक अजूनही अतिक्रमण करून आपली वस्ती निर्माण करतील, नगरपरिषदने आमची मागणी त्वरीत पूर्ण करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत भोपळे यांच्यासह याच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

# नवकार महामंत्राचा सामूहिक जप



प्रतिनिधी ११ एप्रिल

**अकोला :** येथील जीतो महिला विंग आणि युथ विंगच्या वतीने जागतिक नवकार महामंत्र दिनानिमित्त सामुहिक नवकार महामंत्र जपाचे आयोजन करण्यात आले होते. विश्व शांती आणि विश्व कल्याणाच्या कामनेसाठी दरवर्षी ९ एप्रिल रोजी जगभरात नवकार महामंत्राचा जप करण्यात येतो. येथील बाविशी भगवान आयोजित या सामुहिक नवकार महामंत्र जपासाठी वर्धमान स्थानकवासी जैन संघाचे अध्यक्ष कनकभाई शाह यांचेसह मोठ्या संख्येने पुरुष आणि महिला उपस्थित होत्या.आ. रणधीर सावरकर यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी जीतो महिला विंगच्या अध्यक्ष अलका खटोड यांचे हस्ते नवकार महामंत्राचे चिन्ह आ. रणधीर सावरकर यांना भेट देण्यात आले. जगातील १०० देशांतील २००० ठिकाणी नवकार महामंत्र जपाचे एकाचवेळी आयोजन करण्यात आले होते. दिल्ली येथील विज्ञान भवनात आयोजित मुख्य कार्यक्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती. त्यांचे लाईव्ह संबोधन यावेळी उपस्थितांना ऐकविण्यात आले. ना. अमित शाह यांनी समाजाची एकता, संस्कार आणि धर्माचे महत्त्व विशद केले. येथील कार्यक्रमाचे संचालन हिना शाह यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अलका खटोड,कोमल जैन, निर्मला खटोड,प्रिया संकलेचा, निशा सेठी, संजना बिलाला, कुशल जैन, सिध्दार्थ खटोड,कौशल संकलेचा, हार्दिक वोरा यांनी परिश्रम घेतले.

# बाळासाहेब ठाकरे नागरी लोक कल्याण अभियान मनपा शाळांमध्ये राबवावे – नगरसेवक मनोज पाटील

प्रतिनिधी ११ एप्रिल


**अकोला:** हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोक कल्याण अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी विविध महानगरपालिकेच्या शाळेत व्हावी यासंदर्भात चर्चा झाली. शाळेतील मुलांची पटसंख्या कशी वाढेल, शाळा कशी सुंदर



करता येईल व शाळेसाठी अजून काय करता येईल यासंदर्भात नगरसेवक मनोज पाटील नगरसेवक यांनी मत मांडले.महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढावी, या शाळा देखील अन्य शाळांप्रमाणे आकर्षक आणि सुंदर दिसाव्या याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. महापालिका शाळांमधील विद्यार्थी गुणवत्तेत कुठेही कमी राहणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे असे देखील मनोज पाटील म्हणाले. सभागृहाचे लक्ष त्यांनी महत्त्वाच्या विषयाकडे वेधून घेतले.हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोक कल्याण अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे.

त्याची प्रभावी अंमलबजावणी विविध महानगरपालिकेच्या शाळेत व्हावी यासंदर्भात चर्चा झाली. शाळेतील मुलांची पटसंख्या कशी वाढेल, शाळा कशी सुंदर करता येईल व शाळेसाठी अजून काय करता येईल यासंदर्भात नगरसेवक मनोज पाटील नगरसेवक यांनी मत मांडले

# द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त म. फुले यांच्या विचारांचा जागर मांडू...



भारताच्या सामाजिक, शैक्षणिक आणि वैचारिक इतिहासाचा निर्भीड आणि निष्पक्ष वेध घेतला तर एक अत्यंत अस्वस्थ करणारे सत्य समोर येते. ते म्हणजे या देशाने आपल्या सर्वात मूलगामी, दूरदृष्टीच्या आणि मानवमुक्तीवादी समाजक्रांतिकारकांपैकी एक असलेल्या महात्मा जोतीराव फुले यांना दुर्लक्षित केले आहे. एवढेच नाही तर त्यांच्या विचारांना जाणीवपूर्वक मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले आहे. प्रस्थापित सत्ताधारी विषम विचारसरणीच्या हितसंबंधातून रचलेला हा सुनियोजित कट आहे. बहुजन समाजाला दुय्यम ठेवण्यासाठी सत्ताधारी व्यवस्थेने यासाठी ज्ञान, धर्म आणि सत्तेचाही बखुबीने वापर केला आहे.

आज भारत आणि विशेषतः महाराष्ट्र ज्या वळणावर उभा आहेत तिथे विकासाच्या घोषणांमागे सामाजिक आणि आर्थिक विषमतेचे वास्तव लपवले जात आहे. प्रसार माध्यमाच्या जोरावर प्रगतीची भाषा मोठ्या आवाजात बोलली जात आहे पण लोकांच्या प्रश्नाला शांतपणे बगल दिली जात आहे. शिक्षणाच्या विस्ताराचा भास निर्माण करुन त्याचा अभिमान बाळगला जात आहे पण त्या शिक्षणात विचारशक्तीचा अभाव स्पष्टपणे जाणवतो आहे. सामाजिक न्यायाच्या तत्वाला तीलांजली देत आधुनिक आणि प्रगत झालेला समाज आपल्या महापुरुषांना तरी मान्य झाला असता का कळीचा प्रश्न आहे.

म. फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते. ते व्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारे क्रांतिकारक होते. त्यांनी जे प्रश्न उपस्थितकेले ते आजही अनेकांना अस्वस्थ करतात. जातिव्यवस्था का टिकते ? स्त्रीदास्य का ठेवले जाते? ज्ञानावर मक्तेदारी कोणाची आणि का असते? आणि माणूस माणसासारखा का जगू शकत नाही? हे प्रश्न साधे नव्हते, ते सत्तेला हादरवणारे होते. म्हणूनच म. फुले स्वीकारले गेले नाहीत, तर नियंत्रित केले गेले. त्यांच्या विचारांना समाजात रुजू दिले गेले नाही.

भारतीय समाजातील सर्वात मोठी समस्या आहे, ज्याला म. फुल्यांनी 'गुलामगिरी' म्हटले होते. गुलामगिरी ही केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक आणि वैचारिक असते. विचार करण्याची क्षमता जिथे हरवते तिथे गुलामगिरी जन्म घेते. 'गुलामगिरी' या ग्रंथातून फुल्यांनी स्पष्ट केले की, जातिव्यवस्था ही फक्त सामाजिक विभागणी नाही तर ती एक मानसिक यंत्रणा आहे, जी माणसाला माणसाविरुद्ध उभे करते. धर्म, परंपरा आणि संस्कृतीच्या नावाखाली ही यंत्रणा इतकी खोलवर रुजवली आहे की अन्याय सहन करणे हेच कर्तव्य असल्याचे वाटत आहे. आजचे वास्तव तर जास्त धोकादायक आहे. कारण आज गुलामगिरी उघड नाही, ती छुपी आहे. ती शिक्षणात आहे, माध्यमांत, बाजारात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे माणसाच्या विचार आणि दृष्टिकोनातही आहे. बहुजन समाजाला प्रगतीची आस दाखवली जाते, पण प्रत्यक्षात त्याला सत्ता, ज्ञान आणि संसाधनांपासून दूर ठेवले जात आहे.

गुलामगिरीचा दुसरा पैलू म्हणजे आर्थिक शोषण. 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथातून म. फुल्यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाचे जे चिकीत्सक विश्लेषण केले, ते आजही तितकेच लागू पडते. शेतकरी हा उत्पादनाचा केंद्रबिंदू आहे, पण त्याला त्याच्या श्रमाचे योग्य मूल्य मिळत नाही. सत्ता, बाजार आणि व्यवस्थेचे संगनमत त्याला सतत कर्जाच्या आणि असुरक्षिततेच्या गर्तेत ढकलते. सततच्या शेतकरी आत्महत्या हे त्याचेच दृष्य परिणाम आहेत.

अंधश्रद्धा, अज्ञान आणि अंधानुकरण हे या व्यवस्थेचे सर्वात मजबूत आधार आहेत. 'तृतीय रत्न' या नाटकातून म. फुल्यांनी अधोरेखित केले आहे की, शिक्षणाअभावी माणूस सहजपणे कसा नागवला जातो. नवनवीन स्वरूपात अंधश्रद्धेला कसे जिवंत ठेवण्याच काम केले जाते याचे दर्शन या नाटकात आहे. या नाटकामधील परिस्थिती आजही बदललेली नाही हे नुकतेच उघड झालेल्या नाशिक येथील भोंदुबाबा अशोक खरात प्रकरणाने सिध्द केले. अंधश्रद्धा केवळ ही केवळ धार्मिक नाही, ती आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि डिजिटल स्वरूपातही आहे हे खरात प्रकरणाने दाखवुन दिले. माणूस माहिती तंत्रज्ञानाच्या युगात असूनही विवेकशून्य वागतो. माध्यमे आणि डिजिटल यंत्रणा मिळून सत्य आणि असत्य यामधील सीमारेषा धूसर करत आहेत. राजकीय नेते याला कसे प्रोत्साहन देतात आणि आपल्या राजकीय फायद्यासाठी कसा याचा वापर करतात याचेही ओंगळवाणे दर्शन यातुन झाले आहे.

म. फुल्यांची सर्वात मोठी देणगी म्हणजे त्यांनी समाजाला 'प्रश्न विचारण्याची, तर्क करण्याची संस्कृती' दिली. ज्या समाजात प्रश्न विचारले जात नाहीत, तिथे सत्तेला कधीही उत्तर द्यावे लागत नाही आणि जिथे सत्तेला उत्तर द्यावे लागत नाही, तिथे अन्याय कायम राहतो. ठअगर सडके खामोश हो जाए तो संसद आवारा हो जाएगीठ असे डॉ. राम मनोहर लोहिया यांनीही म्हटले आहे. ते आजही जसंच्या तसे लागु पडते. प्रश्न विचारणाऱ्यांकडे संशयाने पाहिले जात आहे, प्रसंगी त्यांना देशद्रोही सुध्दा ठरविले जात आहे. म. फुले यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुल्यांच्या सहकार्याने उभारलेले शिक्षणकार्य हे केवळ शाळा उघडण्यापुरते मर्यादित नव्हते तर ते विशिष्ट जातीच्या ज्ञानाच्या मक्तेदारीवर थेट प्रहार करणारे होते. ज्या समाजात स्त्रीला शिक्षणबंदी असते, तिथे ती केवळ सामाजिकच नव्हे, तर मानसिक गुलाम बनते. फुले दाम्पत्यांनी त्या काळात शिक्षणाच्या माध्यमातुन गुलामगिरीचा साखळदंड तोडण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रस्तापित सत्ताधारी वर्ग 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' लागु करुन गुलामगिरीचा हा साखळदंड जोडण्यासाठी प्रयत्नरत आहे. परीणामी पटसंख्येच्या नावाखाली महाराष्ट्रातील शाळा बंद केल्या जात आहेत. या माध्यमातुन शिक्षणाचे खाजगीकरण, कार्पोरेटीकरण करुन बहुजनांची शैक्षणिक कत्तल करण्याचा जणु अजेंडा राबविण्यात येत असल्याचा सप्रमाण आरोप शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक रमेश बिजेकर यांनी केला आहे.येणारे वर्ष हे म. फुले यांचे व्दिशताब्दी जयंती वर्ष साजरे होत आहे. एक उत्सव म्हणून महात्मा फुल्यांची जयंती आपण जरुर साजरी केली पाहिजे. पण एक समाजक्रांतिकारक म्हणून त्यांना, त्यांच्या साहित्याला समजून घेणे तेवढेच गरजेचे आहे. त्यांच्या विचारांना समजुन न घेता, ते आपल्या आचरणात न आणता आपण म. फुल्यांचे अनुयायी आणि वारसदार ठरतो का हा प्रश्न स्वतःलाच विचारण्याची वेळ आली आहे.

**राम श्रृंगार**
वाशिम , मोबाईल : ९८२२२१५३२१

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**(E-Tender Notice)**

Duly filled in and digitally signed Online bids for e-Tender No. **CE/AKLZ/AKL/T-01/2026-27** are invited; for supply of various Testing Equipment for Testing Division Akola, under Akola Zone, for amount **Rs. 50.00 Lakhs.**

The Tender details/documents will be available on web site https://etender.mahadiscom.in/eatApp/ from 09.04.2026 onwards and last date of submission is 16.04.2026 upto 15.00 hrs. Changes in Tender Schedule, Corrigendum etc., if any, will be available on M.S.E.D.C.L.'s web site only.

**The Executive Engineer (Adm.)**
**(P.R.O No. 46/2026) MSEDCL (O&M) Zone Office, Akola.**


क्रांतीसूर्य
महात्मा
ज्योतिबा फुले
जयंती निमित्त
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छूक
माळी महासंघ
राजेश जावरकर
माळी महासंघ विभागीय अध्यक्ष
मनोज झाडे
फ्रीडम बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष आकोट, माळी महासंघ विभागीय सचिव
रवींद्र पोटदुखे
कैतेंय एज्युकेशन प्रा.लि. संचालक, माळी महासंघ युवा आघाडी जिल्हाध्यक्ष,
दीपक खलोकार
माळी महासंघ जिल्हाध्यक्ष
केशव रां. लांडे
माजी सरपंच ग्रा.अकोलखेड माळी महासंघ जि. उपाध्यक्ष
कमलेश येवले
माळी महासंघ युवा आघाडी उपाध्यक्ष
अमोल निमकर
क्षत्रिय माळी समाज पंच मंडळ अध्यक्ष व माळी महासंघ जि. कोषाध्यक्ष
हर्षल खासबागे
माळी महासंघ शहराध्यक्ष
सचिन सुपासे
वंचित ब.आ. ता.उपाध्यक्ष, माळी महासंघ ता. उपाध्यक्ष,
अतुल अढाऊ
महात्मा फुले प्रतिष्ठान अध्यक्ष, अखिल भारतीय माळी महासंघ जि. कार्यकारणी सदस्य
रविंद्र निमकर्डे
ता. अध्यक्ष माळी महासंघ ता.तेल्हारा विमा व आर्थिक गुंतवणूक सल्लागार
जगन बगाडे
धरती जैविक शेती मिशन अध्यक्ष व माळी महासंघ शेतकरी आघाडी जि. उपाध्यक्ष
सचिन भुस्कट
माळी महासंघ सदस्य
देवेंद्र खलोकार
श्री क्षत्रिय माळी पंच मंडळ अध्यक्ष, वडाळी देशमुख,
मयूर निमकर
नंदिकेश्वर फॅब्रिकेशन, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले उत्सव समिती अध्यक्ष,
गजानन काळे
मा.जि.प.सदस्य / कृ. उ. बा. समिती संचालक अकोट.
महेश खलोकार,
महेश ॲग्रो सेल्स,ज्योतिबा फुले उत्सव समिती कार्याध्यक्ष,
विकास रोही
व्ही आर इंटरप्राईजेस, सेल्स सर्विस रिपेरिंग सेंटर,
प्रमोद बोरखडे
अखिल भारतीय माळी महासंघ शाखा अध्यक्ष अकोली जहागीर
देवानंद झाडे
श्रीमती लक्ष्मीबाई गणगणे कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य वडाळी देशमुख
नंदकिशोर हाडोळे
महाराष्ट्र रा. ग्राम. कर्मचारी संघटना जिल्हा सचिव
तुषार पाचकोर
सामाजिक कार्यकर्ता
श्रीहरी आसलकर
ब्रम्हांडनायक कॉम्प्युटर जॉबवर्क, ऑनलाईन & झेरॉक्स
ऋषिकेश सुपासे
माळी महासंघ जिल्हा महासचिव
अरविंद फुशे
ग्रामपंचायत सदस्य मुंडगाव, माळी महासंघ सदस्य,
विजय नवले
समर्थ सोलर ॲंड सिस्टम, समर्थ एंटरप्राइजेस अकोट
शरद सोनटक्के
माजी अध्यक्ष व कोषाध्यक्ष श्री गजानन महाराज पादुका संस्थान व लक्ष्मी नारायण संस्थान मुंडगाव
निलेश खोलोकार
वडाळी देशमुख,
श्याम बेलसरे
श्री बिल्डिंग मटेरियल्स कोल्हे हॉस्पिटल जवळ दर्यापूर रोड अकोट
अक्षय लहाने
आरोग्य सेवक
दीपक मुंडोकार
भा.ज.पा. ओ.बी.सी. तालुकाध्यक्ष
विनोद श्री.रसे सर
सदस्य माळी महासंघ
अजय अडोकार
अध्यक्ष,श्री विश्वनाथ बिलबिले प्राथमिक मराठी शाळा आकोट महात्मा फुले सार्वजनिक वाचनालय सोमवार वेस अकोट.
कमलकिशोर पिंपळे
सद्गुरु मेडिकल, नित्यानंद शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष मुंडगाव ,
शुभम गणोरकर
गणोरकर धान्य अडक व ट्रेडिंग कंपनी कृ.उ. बा.समिती अकोट
जुगलकिशोर चिंचोळकर
मुंडगाव, ग्रामपंचायत सदस्य
गंगाधर गावंडे
सामाजिक कार्यकर्ते सुकळी
शंतणू लोखंडे
सिव्हील इंजिनिअर
चंदकुमार अग्रवाल
अध्यक्ष, गुलाब बाबा आश्रम अकोलखेड,
विठ्ठल महाराज खलोकार
सचिव, गुलाबबाबा आश्रम,अकोलखेड
कृष्णा रेवस्कर
( शासकीय ठेकेदार )
विठ्ठल टवलारे
माळी महासंघ सदस्य
केशव बिलबिले
वंचित बहुजन आघाडी ता.अध्यक्ष
अचलकिशोर बेलसरे
नगरसेवक, नगरपरिषद अकोट
प्रथमेश बोरोडे
अकोट नगर पालिका, उपनगराध्यक्ष
जाहिरात संकलन
पवन बेलसरे
माळी महासंघ पत्रकार
जिल्हा आघाडी अध्यक्ष
अकोट, तालुका प्रतिनिधी
7057706764.


सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# यवतमाळ जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के

प्रतिनिधी ११ एप्रिल

**यवतमाळ :** हिंगोली जिल्ह्यात आज सकाळी रिश्टर स्केलवर ४.७ तीव्रतेचा भूकंप नोंदविण्यात आला असून त्याचे सौम्य धक्के यवतमाळ जिल्ह्यातही जाणवले. पुसद, वसंतनगर तसेच आसपासच्या भागांमध्ये काही काळ जमिनीला कंप जाणवल्याने नागरिकांमध्ये क्षणिक भीतीचे वातावरण निर्माण झाले.

प्राथमिक माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यात कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झालेले नाही. प्रशासनाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले असून सर्व यंत्रणा सतर्क ठेवण्यात आल्या आहेत. आपत्ती व्यवस्थापन विभाग, महसूल यंत्रणा व स्थानिक प्रशासन संभाव्य परिस्थितीचा आढावा घेत असून कोणत्याही आपत्कालीन घटनेला तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी सज्ज असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. नागरिकांनी घाबरून न जाता संयम बाळगावा आणि अफवांपासून दूर राहून केवळ अधिकृत माहितीकडेच लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, भूकंपाचे धक्के जाणवल्यास सुरक्षिततेच्या दृष्टीने इमारतीबाहेर मोकळ्या जागेत थांबावे व आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशा सूचनाही प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.




# युवकाची हत्या; चार संशयीत ताब्यात

प्रतिनिधी ११ एप्रिल

**यवतमाळ :** एका युवकाची धारदार शस्त्राने वार करून निर्दयीपणे हत्या करण्यात आली. ही घटना शहरातील धामणगाव मार्गावर असलेल्या वेणीशीयन पार्क मध्ये आज शुक्रवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेने परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे.

संतोष टेकाम वय २६ वर्ष रा. लाडखेड असे मृतकाचे नाव आहे. आज शुक्रवारी शहरालगत असलेल्या वेणीशियन पार्क लगत असलेल्या गड्ड्यात एका तरुणाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस



ठाण्याचे पोलीस अधिकारी, डी. बी पथकाचे अधिकारी, कर्मचा-यांनी घटनास्थळ गाठले. पोलिसांनी पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदनासाठी यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. मृतकाची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी मिसींग असलेल्या व्यक्तीची माहिती घेतली. मृतकाच्या हातावर उजव्या हातात कडे व हातावर संतोष असे नाव व जय मातादी असे गोंदन केले होते. त्यावरुन त्याची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले आहे. अज्ञात आरोपीने धारदार शस्त्राने संतोषच्या पाठीवर सहा-सात वार करुन त्यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल पवन तडसे यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास शहर पोलीसासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुरु केला आहे. दरम्यान एलसीबीच्या पथकाने चार संशयीत आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. आरोपींची कसुन चौकशी सुरु असून, लवकरच या प्रकरणाचा उलगडा होणार असल्याची माहिती पोलीस सुत्रांनी दिली.

## ‘धुरंधर’ बघीतल्यानंतर घडले हत्याकांड

■ मृतक संतोष हा ७ एप्रिल रोजी रात्री ९ वाजताचा शो पाहण्यासाठी गेला. त्यानंतर ८ एप्रिल रोजी अज्ञात आरोपीने त्यांच्यावर सपासप वार करुन त्यांचा ‘गेम’ केल्याची प्राथमिक माहिती पोलीसांच्या हाती लागली आहे. मात्र सदर युवकाची हत्या कोणी व का केली हे शोधण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे.

# निम्न पैनगंगा धरणाविरोधात चक्का जाम

प्रतिनिधी ११ एप्रिल

**आर्णी :** निम्न पैनगंगा धरण प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रीय किसान मोर्चाच्या वतीने 10 एप्रिल रोजी तुळजापूर–नागपूर राष्ट्रीय महामार्ग 361 वर आर्णी येथे चक्का जाम आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शेतकरी, शेतमजूर, महिला व युवक सहभागी झाले होते. निम्न पैनगंगा धरण प्रकल्पामुळे सुमारे 95 गावे बाधित



होणार असून जवळपास 50 हजार एकर सुपीक शेती पाण्याखाली जाण्याचा धोका आहे. तसेच सुमारे दीड लाख नागरिकांचे भवितव्य धोक्यात येणार असल्याचा आरोप करण्यात आला.या पार्श्वभूमीवर महामार्गावर चक्का जाम करत शासनाचे लक्ष वेधण्यात आले. “गाव वाचवा, शेती वाचवा,भविष्य वाचवा” अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.आंदोलनात दिपक इंगळे पाटील (प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रीय किसान मोर्चा), बालाजी कांबळे (प्रदेश प्रभारी), दिपक देवसरकर (कार्याध्यक्ष), बिमोद मुधाने यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# IPL क्रिकेट सट्ट्यावर धाड; तिघांना अटक

## ५.६४ लाखांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई


प्रतिनिधी ११ एप्रिल

**यवतमाळ :** नागपूर–तुळजापूर महामार्गावर सुरू असलेल्या ऑनलाईन आयपीएल सट्ट्यावर स्थानिक गुन्हे शाखेने धाड टाकत तिघांना अटक केली. या कारवाईत मोबाईल साहित्य, रोख रक्कम आणि चारचाकी वाहन असा एकूण ५ लाख ६४ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

देवेंद्र दिलीप कुमार कटीयार (वय २८, रा. पळवाडी कॅम्प, यवतमाळ), आशुतोष लक्ष्मीकांत गुप्ता (रा. मारवाडी चौक, यवतमाळ), दिलेश संतोष कुकुलवार (रा. चापनवाडी, जि. यवतमाळ) अशी आरोपींची नावे आहे.

९ एप्रिल रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करत असताना गोपनीय






माहिती मिळाली. त्यानुसार नरसापूर प्रवासी निवाऱ्याजवळ संशयित वाहन आढळून आले. या वाहनात बसलेल्या तिघेजण मोबाईलद्वारे आयपीएलमधील लखनौ सुपर जायंट्स व कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातील सामन्यावर पैशांची बाजी लावत असल्याचे दिसून आले.

पोलिसांनी कारवाई करत देवेंद्र कटीयार, आशुतोष गुप्ता, दिलेश कुकुलवार यांना ताब्यात घेतले. त्यांच्या जवळून सट्टा खेळण्यासाठी वापरले जाणारे चार मोबाईल, ४८७० रुपये रोख रक्कम आणि संबंधित चारचाकी वाहन जप्त करण्यात आले.

या प्रकरणी संबंधितांविरुद्ध जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदवून पुढील कारवाईसाठी कळंब पोलीस ठाण्याकडे त्यांना सुपूर्द करण्यात आले आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात सपोनि मनीष गावंडे, पोउपनि गजानन राजमलू, सफौ सैयद साजीद, योगेश गटलेवार, पोहवा अजय डोळे, प्रशांत हेडाउ, रूपेश पाली, योगेश डगवार तसेच पोशि सुनील पैठणे, देवेंद्र होले व आकाश सूर्यवंशी यांचा समावेश होता.

# वनतळे कोरडी; पाण्याअभावी वन्यजीव गावांकडे धाव

प्रतिनिधी ११ एप्रिल

**महागाव :** तालुक्यातील काळी दौलत वनपरिक्षेत्रात वन्यजीवांसाठी उभारण्यात आलेली वनतळे कोरडी पडल्याने वन्यजीवांसमोर पाण्याचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. परिणामी, पाण्याच्या शोधात प्राण्यांची गावांच्या दिशेने भटकंती वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

उन्हाळ्यात वन्यप्राण्यांना पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी वन विभागाकडून दरवर्षी लाखो रुपयांचा खर्च करून कृत्रिम वनतळे तयार करण्यात येतात. काळी दौलत परिसरातही अशी तळी उभारण्यात आली; मात्र सध्या या तळ्यांमध्ये पाणीच नसल्याचे वास्तव समोर आले आहे. पाण्याअभावी हरिण, रानडुक्कर यांसारखे प्राणी गावांच्या सीमेवर येत आहेत. काही धोकादायक प्राणीही वस्तीच्या दिशेने सरकत असल्याने शेतकरी, मेंढपाळ व पाळीव जनावरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, जंगलात नैसर्गिक



पाणीस्त्रोतांचा अभाव असल्याने वन्यजीव पूर्णपणे वनतळ्यांवर अवलंबून आहेत. अशा स्थितीत वनतळे कोरडी राहिल्याने मानवी-वन्यजीव संघर्ष तीव्र होण्याची शक्यता आहे. दरम्यान, वन विभागाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची टीका होत आहे. वनतळ्यांमध्ये तातडीने पाणी साठवणूक करावी, टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा तसेच देखभाल व निरीक्षण यंत्रणा सक्षम करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# स्व.दोला महाराज वृद्धाश्रमात सेवाभावाचा उपक्रम





प्रतिनिधी ११ एप्रिल

**आर्णी :** उमरीपठार येथील स्व. दोला महाराज वृद्धाश्रमात राजेश आडे यांच्या वाढदिवसानिमित्त एक हृदयस्पर्शी सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यावेळी त्यांच्या हितचिंतकांनी आश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रेमपूर्वक भोजन सेवा तसेच वस्त्रदान केले.

या उपक्रमातून केवळ वाढदिवस साजरा न करता समाजातील वृद्धांचा सन्मान आणि सेवाभाव अधोरेखित करण्यात आला. उपस्थितांनी राजेश आडे यांच्या निरोगी, दीर्घायुष्य व यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान वृद्धांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि आनंद हेच उपक्रमाचे खरे यश ठरले.

त्यांच्या आशीर्वादाने हा दिवस अधिक पवित्र व अर्थपूर्ण झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या उपक्रमासाठी योगदान देणाऱ्या सर्व हितचिंतकांचे आभार मानण्यात आले.

# सावरगड येथील कचरा डेपोला भीषण आग

## सहा तास धग, संपूर्ण परिसर धुराच्या विळख्यात

प्रतिनिधी ११ एप्रिल

**यवतमाळ :** शहरालगतच्या सावरगड येथील यवतमाळ नगरपालिकेच्या कचरा डेपोला शुक्रवारी सकाळी सुमारे 11 वाजता अचानक आग लागल्याने मोठी खळबळ उडाली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले असून तब्बल सहा तासांहून अधिक काळ ती धग कायम होती.

आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेऊन तातडीने नियंत्रणाचे प्रयत्न सुरू केले. पालिकेचे तीन बंब तसेच खासगी बंबांच्या साहाय्याने सतत पाण्याचा फवारा मारण्यात आला. मात्र, कचऱ्याच्या मोठ्या साठ्यामुळे आणि वाढलेल्या उष्णतेमुळे आग आटोक्यात आणण्यात अडथळे येत होते. डंपिंग यार्डच्या मागील भागात



साचलेला कचरा प्रथम पेटल्याचे समजते. वाऱ्यामुळे आगीचा फैलाव झपाट्याने झाला आणि संपूर्ण परिसर धुराच्या विळख्यात सापडला. आगीच्या तीव्रतेमुळे डेपोवरील एक मशीन जळाल्याची माहिती असून काही साहित्याचे नुकसान झाले आहे.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, परिसरात मोठ्या प्रमाणात धूर पसरल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला. रस्त्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती.

आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रशासनाकडून शर्थीचे प्रयत्न सुरू होते. नेमके आर्थिक नुकसान किती झाले, याची अधिकृत माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.

# १४ कोटींचा सिमेंट रस्ता वर्षभरातच उखडला

## स्टील गज उघड्यावर, गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी ११ एप्रिल

**उमरखेड :** छत्रपती शिवाजी महाराज चौक ते ढाणकी रोड उड्डाणपूल बायपासपर्यंत तब्बल १४ कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आलेला सिमेंट रस्ता अवघ्या काही महिन्यांतच उखडू लागल्याने बांधकामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रस्त्यावरील सिमेंटचा थर निघून गिट्टी व लोखंडी गज उघडे पडल्याने वाहनधारकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सहा महिन्यांपूर्वीच रस्त्यावर तडे जाऊन थर उखडण्यास सुरुवात झाली होती.

त्यानंतर सब-ठेकेदाराकडून तात्पुरते पॅचवर्क करण्यात आले. मात्र हे उपाय अपुरे ठरले असून पुन्हा एकदा रस्ता खराब होत असल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः उड्डाणपुलाजवळ परिस्थिती अधिक गंभीर झाली असून दुचाकीस्वारांसाठी अपघाताचा धोका वाढला आहे.

रस्त्याच्या कामात ठिकठिकाणी अनियमितता दिसून येत आहे. कुठे रस्ता अरुंद तर कुठे रुंद, काही ठिकाणी नाल्या रस्त्याच्या वर तर काही ठिकाणी खाली अशा विसंगतीमुळे नियोजनाचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. कामाच्या काळात नागरिकांना धूळ, वाहतूक कोंडी आणि व्यापाऱ्यांचे




नुकसान सहन करावे लागले होते.

कामादरम्यान मशीन वापराबाबत तक्रारी झाल्यानंतर काही काळ काम थांबवण्यात आले होते. मात्र, त्यानंतर पुन्हा घाईगडबडीत काम पूर्ण केल्याने सध्याची स्थिती निर्माण झाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

मूळ ठेकेदार आणि सब-ठेकेदार यांच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित होत असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला जात आहे. नागरिकांमध्ये संतापाची भावना असून “कोट्यवधी खर्चूनही जर रस्ता काही महिन्यांत उखडत असेल, तर जबाबदार कोण?” असा सवाल उपस्थित केला जात आहे.

> ■ उमरखेड करांचा सवाल अधिक तीव्र झाला आहे. कोट्यवधींचा निधी खर्च करूनही रस्त्याची अशी अवस्था होत असेल तर जबाबदारी निश्चित कोणाची, हा प्रश्न नागरिक विचारत आहेत. या प्रकरणात कारवाई होणार का की पुन्हा केवळ पॅचवर्क करून विषय थांबवला जाणार, याकडे लक्ष लागले आहे.

# प्रशासनाच्या सतर्कतेमुळे कुऱ्हाड येथील बालविवाह रोखला

प्रतिनिधी ११ एप्रिल

**यवतमाळ :** घाटंजी तालुक्यातील कुऱ्हाड येथे होणारा एका अल्पवयीन बालिकेचा बालविवाह जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या सतर्कतेमुळे यशस्वीपणे रोखण्यात आला. या तत्पर कारवाईमुळे एका बालिकेचे भविष्य सुरक्षित झाले असून परिसरातून प्रशासनाच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

कुऱ्हाड येथे अल्पवयीन मुलीचा विवाह लावला जाणार असल्याची गोपनीय माहिती जिल्हा बाल संरक्षण कक्षाला प्राप्त झाली होती. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पथक तातडीने गावात दाखल झाले. यावेळी मुलीच्या कुटुंबीयांसह उपस्थित नातेवाईकांना बालविवाह प्रतिबंधक कायद्याची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच बालविवाह केल्यास होणाऱ्या कठोर शिक्षा व दंडाच्या तरतुदी समजावून सांगण्यात आल्या.

कमी वयात विवाह केल्यामुळे मुलीच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम तसेच शिक्षणात होणारे नुकसान याबाबत समुपदेशन करण्यात आले. या समुपदेशनानंतर पालकांना आपली चूक उमजली आणि मुलगी १८ वर्षांची होईपर्यंत तिचा विवाह करणार नाही, असा लेखी जबाब त्यांनी प्रशासनाला दिला.

ही कारवाई जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मारोती पवार, पोलीस निरीक्षक केशव ठाकरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजुरकर आणि चाईल्ड लाईन प्रकल्प समन्वयक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

यावेळी जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या माधुरी पावडे (संरक्षण अधिकारी), आकाश बुर्रेवार (सामाजिक कार्यकर्ता), उपनिरीक्षक अविनाश जाधव, प्रवीण कोकुलवार, सरपंच रणजीत महल्ले, मुख्याध्यापक अमोल डंभारे तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.

सिटी न्यूज अमरावती
शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## १२ एप्रिल रोजी मराठा, कुणबी, देशमुख समाजाचा उपवर-वर वधु परिचय मेळावा

**अमरावती :** अमरावती जिल्हा मराठा महासंघ अमरावती व उल्हे मॅरेज ब्युरो अमरावतीच्या विद्यमाने मराठा, कुणबी, तिरळे कुणबी, देशमुख समाजाचा उपवर-वरवधु परिचय मेळावा दि. १२.०४.२०२६ रविवार रोजी सकाळी ११.०० वाजता शुभमंगलम हॉल, मोती नगर, मोती बाग जवळ, अमरावती येथे आयोजीत करण्यात आला आहे. परिचय मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अमरावती जिल्हा मराठा महासंघ अमरावतीचे माजी अध्यक्ष आदरणीय सुधाकररावजी टाले अध्यक्षस्थानी राहणार आहे. परिचय मेळाव्याचे उद्घाटन . अनिलराव महल्ले विद्यमान अध्यक्ष अमरावती जिल्हा मराठा महासंघ अमरावती हे करतील. प्रमुख अतिथी म्हणून. प्रा. भालचंद्रजी धोंगडे, डॉ. प्रा. गोफणकार रमेशराव गोटखडे, बाबुरावजी देशमुख महासचिव, भास्करराव गावंडे सचिव, विनायकराव रोडे, अशोकराव उल्हे, आशिष देशमुख उपस्थित राहून मार्गदर्शन करतील.

# शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवा- पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

### ‘समता सप्ताह’ सोहळ्यात पालकमंत्र्यांच्या हस्ते कल्याणकारी योजनांचे लाभार्थ्यांना वितरण

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अमरावती:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या भारतीय संविधानानुसार प्रत्येक भारतीयाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला आहे. संविधानाच्या मूल्यांवर भारतीय लोकशाही आधारित आहे. समाजाच्या शेवटच्या घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या निधीतून विशेष तरतूद केली जाते. या लाभार्थ्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवा, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने आयोजित ’समता सप्ताह’ अंतर्गत विविध लोककल्याणकारी योजनांच्या लाभार्थ्यांचा सत्कार आणि लाभ वितरण सामाजिक न्याय भवन येथे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते




बोलत होते.

आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, राजेश वानखडे, प्रवीण तायडे, महापौर श्रीचंद तेजवानी, प्रवीण पोटे-पाटील, जिल्हाधिकारी आशिष येरेकर ,प्रादेशिक उपायुक्त माया केदार, सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर आदी यावेळी उपस्थित होते. पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, भारतीय संविधानामुळे आज १४० कोटी भारतीय एकत्रित आहे. ही संविधानाची ताकद आहे. ’समता सप्ताह’ सर्वसामान्यांच्या सक्षमीकरणासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे. शहरातील इर्वीन चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विशेष स्मारक तयार करण्यात येणार आहे. प्रत्येकाला शिक्षणाची संधी मिळावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे. शैक्षणिक सुविधेअभावी एकही विद्यार्थी मागे पडू नये याची दक्षता घ्यावी. नागपूरच्या धर्तीवर अमरावतीमध्येही समाज कल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी अद्यावत अभ्यासिका आणि ई-लायब्ररी सुरू करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

यावेळी अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दुर्दैवी घटनांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना शासनामार्फत नोकरीचे नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. त्याचप्रमाणे, ‘कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजने’अंतर्गत लाभार्थ्यांना जमिनीच्या पट्टयांचे वाटप करण्यात आले. समाज कल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृहात आणि अभ्यासिकांमध्ये अभ्यास करून शासकीय नोकरी मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला. राजश्री छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती , अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेश शिष्यवृत्ती तसेच इतर विविध योजनांच्या लाभांचे वितरणही यावेळी करण्यात आले.

सामाजिक न्याय विभागाच्या लोककल्याणकारी योजनांच्या माहिती पुस्तिकेचे यावेळी विमोचन करण्यात आले. समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन आणि आभार श्रीकृष्ण पखाले यांनी केले.

# अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अमरावती :** स्त्री शिक्षणाचे अग्रदूत, बहुजन,शेतकरी व कष्टकरी समाजाला शिक्षणाची दारे खुली करणारे क्रांतिसूर्य, थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने आज चित्रा चौक येथील महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी खासदार बळवंतराव वानखडे, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलु शेखावत,माजी महापौर तथा विरोधीपक्षनेता मनपा विलास इंगोले,माजी महापौर मिलिंद चिमोटे यांनी पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले.यावेळी राजीव भेले, सुनीता भेले, राजश्री जठाळे, संजय वाघ,अभिनंदन पेंढारी, संजय शिरभाते,सुरेश रतावा,राजाभाऊ



हाडोळे, रामाभाऊ सोळंके,संजय नागोणे,पुरुषोत्तम मुंदडा, गजानन राजगुरे,प्रफुल्ल भोजने, अरविंद अकोलकर,नाना मालधुरे,राजेंद्र आंडे,प्रकाश लोखंडे, राधेश्याम यादव, दिलीप मासोदकर, अजय राऊत,दीपक हुंडीकर, ओमप्रकाश अंबाडकर, सुनील वासनकर, ज्योती बाविस्कर, प्रदीप शेवतकर,अमर देशकर, रुपेश फसाट,विनोद बोबडे, संदीप राऊत,श्रीकांत नागरीकर, श्रीधर देशमुख,राजाभाऊ खवले,देवानंद गणोरकर, सचिन चर्जन यांच्यासह काँग्रेस पक्षातील अनेक मान्यवर उपस्थित होते.महात्मा फुले यांच्या क्रांतिकारी विचारांचा वारसा पुढे नेण्याचा व त्यांच्या आदर्शानुसार समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत शिक्षण व समता पोहोचवण्याचा संकल्प याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.

# भूमी अभिलेख कार्यालयाला अत्याधुनिक उपकरण वाटप

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अमरावती:** भूमी अभिलेख विभागामार्फत भूमापन दिनानिमित्त जमीन मोजणी कार्यवाहीच्या अत्याधुनिक उपकरणांचे वाटप जिल्हाधिकारी कार्यालय येथे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार सुलभाताई खोडके, राजेश वानखडे, प्रवीण तायडे, केवलराम काळे, महापौर श्रीचंद तेजवानी, प्रवीण पोटे-पाटील, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, भूमिअभिलेख जिल्हा अधीक्षक महेशकुमार शिंदे यावेळी उपस्थित होते. पालकमंत्री श्री




बावनकुळे म्हणाले,नियोजित भूमापन मोजणीचा कालावधी कमी करून तो पंधरा दिवसांवर आणावा. त्यासाठी मोजणी साहित्य तसेच यंत्रसामुग्री देण्यात आले आहे. यापूर्वी नियमित मोजणीसाठी ९० दिवस तसेच द्रुगतीसाठी ३० दिवस असा कालावधी होता. हा कालावधी कमी करण्यात यावा. जिल्ह्यात या कामासाठी मनुष्यबळ कमी पडत असल्यास जिल्हास्तरीय समितीमार्फत मनुष्यबळाची भरती करण्यात यावी. नगर भूमापनचे काम भू - नक्शा या प्रकल्पाखाली करण्यात येत आहे. हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राज्यात दहा ठिकाणी सुरू करण्यात आला आहे. या स्तरावर जिल्ह्यातही प्रकल्प राबविण्यात यावा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाने खरेदी केलेल्या पाच वाहनांना पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी हिरवी झेंडी दाखविली. ही वाहने चांदूर रेल्वे, चांदूर बाजार, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, वरूड तहसिलदारांना वितरीत करण्यात आले.

# श्री. शिवाजी शिक्षण संस्थेत शिक्षणमहर्षी भाऊसाहेबांना अभिवादन

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अमरावती :** शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त पंचवटी चौकातील त्यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून आयोजित कार्यक्रमात श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने भाऊ साहेबांना करण्यात आले. भाऊ साहेबांचे कार्य दीपस्तंभासारखे असल्याचे श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी सांगितले. तसेच भाऊसाहेबांचे शिक्षण, कृषी, राजकीय, सामाजिक व इतर अनेक क्षेत्रात मोलाचे योगदान असल्याचे आमदार सुलभा खोडके यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. अमरावती येथील श्री. शिवाजी शिक्षण



संस्था येथे ६१ वी पुण्यतिथी शुक्रवार दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९:३० वाजता अत्यंत श्रद्धापूर्वक साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

समारंभाचे अध्यक्ष म्हणून श्री. शिवाजी शिक्षण संस्था अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी कार्यक्रमाचे नेतृत्व केले. यावेळी प्रमुख उपस्थितीत राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, लोकसभा सदस्य बळवंत वानखडे, विधानसभा परिषद सदस्य संजय खोडके, विधानसभा सदस्य सुलभाताई खोडके तसेच अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी हे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान पुण्यतिथीनिमित्त दिवंगत व्यक्तीस श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच संस्थेच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून दिवंगत व्यक्तीच्या कार्याची आठवण करून देत त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजानन केशवराव पुंडकर, उपाध्यक्ष ॲड. जयवंत भैय्यासाहेब पाटील(पुसदेकर), उपाध्यक्ष केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, सदस्य हेमंत काळमेघ, सदस्य प्राचार्य केशवराव गावंडे, सदस्य सुरेश खोटरे, सदस्य सुभाष बनसोड, सचिव प्राचार्य डॉक्टर विजय ठाकरे, अंबादास कुलट, स्वीकृत सदस्य विजय ठोकळ तसेच स्वीकृत सदस्य डॉक्ट अमोल महल्ले यांची उपस्थिती होती.

# गुरुवर्य स्व. अंबादासपंत वैद्य मार्गाचे लोकार्पण, कुस्ती मॅट वितरण

### श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या विकासासाठी कटिबद्ध - पालकमंत्री बावनकुळे

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अमरावती:** गुरुवर्य स्वर्गीय अंबादासपंत वैद्य यांनी सन १९१४ मध्ये स्थापन केलेले श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ आजही राष्ट्रहिताच्या विचारावर अग्रेसर आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन संस्थेतून आंतरराष्ट्रीय खेळाडू घडले आहेत. पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांचे समर्पित कार्य आणि व्यक्तिमत्त्वाचे महत्व लक्षात घेता सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

गांधी चौक ते ओसवाल भवन मार्गाचे गुरुवर्य स्व. अंबादासपंत वैद्य मार्ग असे नामकरण करण्यात आले आहे. या निमित्ताने नामफलकाचे लोकार्पण, तसेच कुस्ती मॅट वितरण सोहळा शुक्रवार, दि. १० एप्रिल रोजी पार पडला. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य अध्यक्षस्थानी होते. पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते फलकाचे उद्घाटन, तसेच कुस्ती मॅटचे पूजन करण्यात आले. यावेळी मंडळाच्या वतीने पालकमंत्री श्री. बावनकुळे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला आमदार प्रविण तायडे, राजेश वानखडे, इतर मागासवर्ग आयोगाच्या सदस्य किरण महल्ले, अचलपूरच्या नगराध्यक्षा रुपाली माथने, प्रवीण पोटे, राजेश देशमुख, किरण पातुरकर, मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, डॉ. संजय तिरथकर, सुनील खराटे उपस्थित होते. प्रा. डॉ. माधुरी चेंडके यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विजय पांडे आणि आशीष हटेकर यांनी सूत्रसंचालन केले.

# अमरावतीत सुरेश भट स्मारक, गुरूकुल उभारणार

### पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अमरावती:** अमरावतीला गझलेचा समृद्ध वारसा आहे. कविवर्य सुरेश भट यांनी सुरू केलेला प्रवास हा आता भिमराव पांचाळे यांनी जपला आहे. या महान व्यक्तींच्या कार्याचा वारसा पुढे चालावा यासाइी सुरेश भट यांचे स्मारक आणि गझलेसाठी गुरूकुल उभारण्याची महत्वपूर्ण घोषणा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

गझलनवाज भिमराव पांचाळे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त ईलेक्ट्रॉनिक मिडीया असोशिएशनच्या वतीने सांस्कृतिक भवनात नागरी सत्कार पार पडला. यावेळी खासदार बळवंत वानखडे, आमदार संजय खोडके, आमदार केवलराम



काळे, आमदार सुलभा खोडके, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रविण तायडे, महापौर श्रीचंद तेजवाणी, माजी मंत्री प्रविण पोटे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, ईलेक्ट्रॉनिक मिडीया असोशिएशनचे अध्यक्ष नितेश राऊत, गिता पांचाळे, भाग्यश्री पांचाळे आदी उपस्थित होते. पालकमंत्री बावनकुळे यांनी स्मारक आणि गुरूकुलासाठी जागा आणि निधीची तरतूद शासन करणार आहे. यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा, तसेच गझलेसाठी जीवन समर्पित करणारे पांचाळे यांनी गुरूकुलाची जबाबदारी स्विकारण्याचे आवाहन केले. यातून गझलेचे जतन आणि संवर्धन होण्यास मदत हाईल. लवकरच या दोन्हीचे भूमिपूजन करण्याचा मानस असून यावेळीही श्री. पांचाळे यांचा नागरी सत्कार करण्यात येईल. गझलेमध्ये जीवन समृद्ध करण्याची क्षमता आहे. गझलेचे शब्द आणि सूर जीवन समृद्ध करतात. श्री. पांचाळे यांच्यामुळे मराठी गझलेला सांस्कृतिक परंपरेत स्थान? मिळाले. गझल जगायला लावत असल्याने आज तरूण पिढी गझलेकडे आकर्षित होत आहे. मराठी गझलेमुळे प्रदेशाची ओळख इतर देशांमध्ये होण्यास मदत मिळाली आहे.

# राखीसाठी हप्ता वसुली; रतन इंडिया कंपनीत दादागिरी

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अमरावती :** रतन इंडिया कंपनी मध्ये राखेसाठी दादागिरी करणारे बाहेरील जिल्ह्यातील ट्रक्स स्वतःच्या नावाने चालवण्यासाठी घेतात एका ट्रक्स चे १० हजार रुपये अवैध हफ्ता वसुली करीत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून यासंदर्भात जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षक यांना युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदन दिले आहे.

गेल्या अनेक महिन्यापासून रतन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीद्वारे अमरावती जिल्ह्यात लोकल स्थानिक भूमी धारकांना राख विक्री केल्या जाते, अमरावतीचे रहिवासी असल्याकारणाने त्यांची वेगळी रांग लागून त्यांना नंबर नुसार २४ तासात १ ट्रक भरून मिळतो, व



प्रत्येक लोकल ५ ट्रक्स मागे १ बाहेरील जिल्ह्यातील ट्रकला राख दिल्या जाते, परंतु याच गोष्टीचा फायदा घेऊन जवळपास १०० ट्रक्स आणि डंपर मालकांनी स्थानिक कंपनी व ऐश टेक च्या अधिकाऱ्यांना व काही दादागिरी करणाऱ्या लोकांना मासिक १०,००० रुपये हफ्ता देऊन लोकलची गेटपास व पावती बनवून विक्री केली जात आहे. यात एका ट्रक साठी १० हजार रुपये तर १० ट्रक्स साठी १ लाख रुपये अवैध हफ्ता घेतल्या जाते यात कंपनीतील वरिष्ठ अधिकारी कर्मचारी साहेबांपर्यत हफ्ता पोहचत असल्याची चर्चा बाहेरील जिल्ह्यातील ड्रायवर व मालक करत आहेत,

या सर्व प्रकारामुळे स्थानिक लोकांच्या रोजगारावर परिणाम होत आहे, कारण बाहेरील जिल्ह्यातील लोकांनी पैसे देऊन खोट्या गेटपास पावती बनवून १०० वर डंपर वाढल्यामुळे ज्याठिकाणी १२ ते २४ तासात लोकल डंपर भरून निघत होते तिथे आता ३० ते ४८ तास वेळ लागत आहे, लोकल स्थानिक भूमिपुत्रांच्या १०० ते १५० गाड्या चालत होत्या त्याठिकाणी आता बाहेरील ३०० ते ४०० गाड्या वाढल्या आहेत, म्हणून यासाठी लोकल स्थानिक नागरिकांचे रोजगाराचे नुकसान होऊ नये तत्काळ स्वरूपात बाहेरील जिल्ह्यातील बोगस गाड्यांचे गेटपास व पावती रद्द करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी युवासेनेने केली व बाहेरील डंपर स्वतःच्या नावावर चालवणाऱ्या व अवैध हफ्ता वसुली करणाऱ्या लोकांच्या मुसक्या आवराव्यात.. व सर्व स्थानिक भूमिपुत्र नागरिकांना न्याय द्यावा असे निवेदन जिल्हाधिकारी अमरावती तसेच पोलिस अधीक्षक ग्रामीण यांना देण्यात आले.

यावेळी युवासेना उपजिल्हाप्रमुख शुभम परळीकर, प्रशांत परळे, युवासेनेचे शुभम मेहरे, अक्षय पवार, विकी लसणकर, श्रीकांत सरोदे आदी उपस्थित होते.

# आमझरी बनणार ‘मधाचे गाव’

### पर्यटन आणि रोजगारासाठी त्रिपक्षीय करार

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अमरावती:** मेळघाटातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा शाश्वत वापर करून स्थानिक आदिवासी बांधवांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी चिखलदरा तालुक्यातील आमझरी येथे ’मधाचे गाव’ ही योजना राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आज महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, वन विभाग आणि आमझरी ग्रामपंचायत यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार (श्दळ) पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत महसूल भवन येथे करण्यात आला.

यावेळी आमदार केवळराम काळे, प्रवीण तायडे, संजय खोडके, सुलभा खोडके, राजेश वानखडे, जिल्हाधिकारी आशिष



येरेकर, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदीप चेचरे आणि आमझरीचे सरपंच व लाभार्थी उपस्थित होते. खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण दिले जाणार असून, वन विभाग पायाभूत सुविधांची जबाबदारी सांभाळेल, तर ग्रामपंचायत स्थानिक स्तरावर प्रकल्पाचे दैनंदिन संचालन व देखभाल करणार आहे.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या नेतृत्वाखाली हा अभिनव प्रकल्प ’संयुक्त उपक्रम’ म्हणून राबविला जाणार आहे. निसर्ग पर्यटनासोबतच मधमाशी पालन, प्रक्रिया आणि विक्रीची एक सक्षम मूल्यसाखळी निर्माण करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून ५४ लक्ष रुपये आणि जिल्हा नियोजन समितीमार्फत २७ लक्ष रुपये असा एकूण ८१ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या करारांतर्गत आमझरी येथील वन विभागाच्या पर्यटन संकुलात सामूहिक सुविधा केंद्र, मध प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट, आणि माहिती केंद्र उभारले जाईल. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ’हनी थीम’ आधारित सेल्फी पॉईंट आणि मधुबन निर्मितीसह पर्यावरणपूरक सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे. यामुळे ’मधुपर्यटन’ ही नवी संकल्पना चिखलदऱ्यात रुजणार असून स्थानिक स्वयंसहायता गट, महिला आणि युवकांना उत्पन्नाचे मोठे साधन उपलब्ध होणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार दि ११ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



## बांधकाम विभागात मार्च एंडिंगच्या नावाखाली...

# कामे रातोरात, बिले हातोहात !

### * खोट्यांसाठी फिफ्टी-फिफ्टीचे धोरण * खऱ्यांचे टक्केवारी देवूनही मरण

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम येथील सार्वजनिक विभागातील कार्यकारी अभियंता शुभम जोशी व त्यांची मर्जी सांभाळून भ्रष्टाचार करणाऱ्या चौकडीने ३१ मार्च २०२६ पुर्वी शासकीय निवासस्थानाच्या देखभाल, दुरूस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून मिळालेल्या तिन कोटी चाळीस लाख रुपयाची कामे रातोरात करून बिले हातोहात काढली आहेत. तर दुसरीकडे खऱ्या काम करणाऱ्या कंत्राटदारांनी टक्केवारी देवूनही दोन वर्षापासून बिलांसाठी चप्पला घासाव्या लागत आहेत. अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट धोरणामुळे खऱ्या ठेकेदाराचे मरण होत आहे. बिले रोखल्यामुळे महाराष्ट्रात अनेक ठेकेदारांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत.



वाशीम शहरातील ३४ शासकीय निवासस्थानाच्या देखभाल, दुरूस्तीसाठी प्रत्येकी १० लाख रूपये प्रमाणे एकूण तिन कोटी चाळीस लाख रूपयाचा निधी जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त झाला आहे. हा निधी ३१ मार्च २०२६ पुर्वी खर्च न झाल्यास हा निधी शासनाकडे परत जातो. या कोट्यवधीच्या निधीतून आपणही कोट्यवधीची वरकमाई करण्यासाठी सा.बां.विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांनी पुढाकार घेतला. या ३४ कामाचे वितरण शासन निर्णयाप्रमाणे ३३इ गुणोत्तरात करण्याची गरज होती. परंतु या ३४ कामात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करून स्वत:ची व मर्जी सांभाळणाऱ्या ठेकेदारांची तुंबडी भरण्यासाठी शासन आदेशाला बाजूला सारून ही ३४ कामे जोशी यांनी मर्जी सांभाळणाऱ्या विश्वासू लोकांना वितरीत करून प्रत्येक कामात जोशी यांची भागिदारी असल्याची बांधकाम विभागात चर्चा आहे. सार्वजनिक बांधकाम विभागात काम पुर्णझाल्यानंतरच त्या कामाचे देयक संबंधित ठेकेदाराला देण्यात येते. मात्र, या देखभाल, दुरूस्तीच्या कामात कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांनी सर्व कामासाठी प्रत्येकी ६०इ रक्कम म्हणजेच एका कामासाठी सहा लाख रूपये अग्रिम देवून या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होणार असल्याचे सिद्ध करून दिले आहे. या सर्व गैलप्रकाराची वरिष्ठांनी दखल घेवून दोषींवर फौजदारी कारवाई करावी अशी मागणी अन्याय झालेल्या मंडळीकडून होत आहे.

## बांधकाम विभाग भ्रष्टाचारात अव्वल

वाशीम जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांच्या अफलातून कारभाराच्या अनेक सुरसकथा चर्चिल्या जात आहेत. गैरप्रकारात अव्वल असलेल्या जोशींची सखोल चौकशी करण्यासाठी मंत्र्याचा दबाव येत असल्याची बांधकाम विभागात चर्चा आहे. गुणवत्ता नियंत्रक अधिकारी यांनी जोशी यांना तब्बल २० पत्र देवूनही त्यापैकी एकाही पत्राची जोशी यांनी दखल न घेता त्यांचा 'अफलातून' कारभार सुरु ठेवल्याने वरिष्ठांसह जिल्ह्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले असल्याची चर्चा आहे.

वाशीम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरादेवीच्या विविध विकासकामांसाठी केंद्र व राज्य शासनाने अगोदर ५५० कोटीचा व सद्या ४०० कोटीचा निधी दिला. या कोट्यवधीच्या विकासकामात कार्यकारी अभियंता जोशी यांनी अनियमितता करून त्यांच्या गॉडफादरची मर्जी सांभाळण्यासाठी गॉडफादरच्याच चेलेचपाट्यांना कामे दिलीत. या कामामध्येसीद्धा मोठ्या प्रमाणात गैरप्रकार केल्याचा आरोप होत आहे. त्या पाठोपाठ जिल्हा नियोजन समितीमधून वाशीम येथील ३४ शासकीय निवासस्थानाच्या देखभाल, दुरूस्तीसाठी प्रत्येकी १० लाख रूपयेप्रमाणे एकूण तिन कोटी ४० लाख रुपयाचा निधी मंजुर करण्यात आला. परंतु या निधीची ३१ मार्चपुर्वी विल्हेवाट लावून कोट्यवधीची उलाढाल करून मालामाल होण्यासाठीच कार्यकारी अभियंता जोशी यांनी शासन निर्णयाला बगल देवून ती कामे त्यांच्या मर्जीतील ठेकेदारांना वाटलीत. असा आरोप बांधकाम विभागात चर्चा आहे. या सर्व गैलप्रकाराची चौकशी करण्यासाठी काँग्रेसचे नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत लक्षवेधी लावून शासनाला जाब विचारला आहे.

राज्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग राज्यमंत्री ना .इंद्रनील नाईक यांनी पुढाकार घेतल्याचे समजते. गैरकारभारात तरबेज असलेले जोशी यांना माजी पालकमंत्र्यांचा वरदहस्त आहे. त्या मंत्रीमहोदयाचचे व पुसदच्या नाईक घराण्याचे विळ्या-भोपळ्याचे सख्य असल्याची चर्चा आहे.




## थोडक्यात

### काटा येथे क्षयरोग तपासणी शिबीर



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

प्राथमिक आरोग्य केंद्र काटा येथे संशयित क्षयरुग्नाचे तपासणी शिबिर घेण्यात आले यावेळी हॅन्ड हेल्डङ एक्स रे मशिनद्वारे तपासणी करण्यात आली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ अनिल कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ सतीश परभणकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ मनीषा चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली क्ष किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी ५३ संशयितांचे एक्स रे काढले. यावेळी उपस्थित जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ सतीश परभणकर, अति जिल्हा अधिकारी डॉ विजय काळे, वैद्यकीय अधिकारी डॉ कोमल टार्फे, वैज्ञानिक अधिकारी अश्विनी मुठाळ, फार्मसी ऑफिसर प्राची कपुरे, आरोग्य सहाय्यक महेंद्र वानखडे, शुभम गोटे, आरोग्य सहायीका आशा ढोके, आरोग्य सेवक पुंडलिक देवढे, सुनील टोलमारे, उपचार पर्यवेक्षक मंगेश पिंपरकर, कुष्ठ तंत्रज्ञ प्रदुम्न सदार, वाहनचालक गणेश राऊत, मनिष जाधव, आकाश केंद्रे, विकास सूडके, घनश्याम चेंद्रशेखर तसेच आशा कार्यकर्ती ईत्यादी उपस्थित होत्या शिबिराचे नियोजन जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी केले. सर्व उपस्थितांना क्षयरोग, डेंगू बाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले.

### सफाई कामगारांच्या हक्कांबाबत तडजोड !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

सफाई कामगारांसाठी शासनाने अनेक योजना जाहीर केल्या असल्या, तरी त्यांची अंमलबजावणी केवळ कागदावरच मर्यादित राहिली आहे. योजना, निधी आणि आदेश उपलब्ध असतानाही अंमलबजावणी होत नसेल, तर संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाईल, असा इशारा राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिला.

हाताने मैला उचलण्यास प्रतिबंध अधिनियम २०१३ च्या अनुषंगाने स्थानिक प्राधिकरणांचा आढावा घेण्यासाठी आज दि.९ एप्रिल रोजी आयोजित जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, सहायक आयुक्त पीयूष चव्हाण, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांच्यासह सर्व मुख्याधिकारी उपस्थित होते.

आयोगाचे अध्यक्ष श्री.डागोर यांनी पुढे सांगितले की, अनेक ठिकाणी २५ वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या सफाई कामगारांना अद्याप मालकी हक्काचे पट्टे मिळालेले नाहीत. तसेच २००८ पासून प्रलंबित घरकुल योजनांची अंमलबजावणीही पूर्ण झालेली नाही. स्वातंत्र्याला ७५ वर्षे उलटूनही या घटकाला मूलभूत हक्कांसाठी संघर्ष करावा लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

## खदान मालकाची अतिरिक्त उत्खनानातून मुजोरी...

# अवैध खनिजाचे गौण, अधिकाऱ्यांचे अर्थपूर्ण मौन !

### * महसूल विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष * सर्व खदानीची ड्रोनद्वारे मोजणी करण्याची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्यामध्ये मागील ७/८ वर्षापासून समृध्दी महामार्ग आणि अकोला-नांदेड राष्ट्रीय महामार्गासह जिल्ह्यातील अनेक रस्त्याचे कामे मोठ्या प्रमाणात झाली. व इतरही रस्त्याचे कामे सुरू आहेत. या रस्त्याच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात गौण खनिजाची आवश्यकता असल्याने वाशीम जिल्ह्यातील सहाही तालुक्यातील 'राजाश्रय' असलेल्या सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गौण खनिजाच्या खदानी सुरू केल्या आहेत. 'त्या' खदानीमधून नियमबाह्य व अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन करून त्या सर्व खदान मालकाची परिस्थिती 'सुजलाम-सुफलाम' झाली असून शासनाच्या कोट्यवधी रूपयाच्या महसूलाला खदान मालकानी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगणमत करून कोट्यवधीचा चुना लावल्याची चर्चा जनतेमध्ये आहे. जिल्ह्यातील सर्व गौण खनिज खदानीची ड्रोनद्वारे मोजणी केल्यास सत्य समोर येवून महसूलात वाढ होईल.

वाशीम जिल्ह्यात पाच वर्षापूर्वी मोजक्याच गौण खनिजाच्या खदानी होत्या. नंतर या व्यवसायातून करोडपती झालेल्या खदान मालकाचा आदर्श डोळयासमोर ठेवून जिल्ह्यातील सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कमी कालावधीमध्ये



'मालामाल' करणाऱ्या या व्यवसायामध्ये पदार्पण योगायोगाने ७ वर्षापूर्वी वाशीम जिल्ह्यातून समृध्दी महामार्ग व अकोला-नांदेड राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचा श्रीगणेशा झाला. या दोन्ही महामार्गासह जिल्ह्यातील अनेक महत्वाच्या रस्त्याची कामे सुध्दा सुरू झालीत. या सर्व रस्त्याच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात गौण खनिजाची गरज असल्यामुळे या रस्त्याचे काम घेणारे कंत्राटदार व जिल्ह्यातील काही लोकांनी त्यांना सोयीचे ठिकाण असलेल्या जागेवर गौण खनिज खदानीचे महसूल विभागाकडून परवाने काढले. संबंधित लोकांनी व कंत्राटदारांनी 'त्या' खदानीतून नियम बाह्य व अवैधरित्या गौण खनिजाची उत्खनन केल्याचा प्रकार वाशीम तालुक्यातील तामसाळा येथे उघडकीस आला आहे. मोन्टो कार्लो कंपनीला वाशीमच्या तहसीदाराने अतिरीक्त अवैध उत्खनन केल्याप्रकरणी ४० कोटी रूपयाची रॉयल्टी



भरण्याचे आदेश दिले होते. या कारवाईमुळे वाशीम तालुक्यातील महसूलाचे उदिष्ट पुर्ण झाले असले तरी वाशीम तालुक्यातील सर्वच गौण खनिजाच्या खदानीमध्ये क्षमतेपेक्षा जास्त नियमबाह्य व अवैधरित्या गौण खनिजाणचे उत्खनन झाल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्या आहेत. वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगरूळपीर, मानोरा आणि कारंजा लाड, या सहाही तालुक्यातील सर्वच गौण खनिज खदान मालकांनी मागील ७ ते ८ वर्षात किती ब्रास गौण खनिज उत्खननाची 'स्वामीत्वधनाची' (रॉयल्टीची) रक्कम भरली आहे. आणि त्या खदानीतून किती ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केले आहे. याची गौणद्वारे मोजणी करून जिल्ह्यातील सर्व गौण खनिजाच्या खदान मालकांनी शासनाचा किती कोटी रूपयाचा महसूलाला 'चूना' लावला ही बाब उघडकीस येणार आहे. महसूल विभागातील जबाबदार






अधिकाऱ्यांनी आपल्या वैयत्तीक स्वार्थाला बाजूला ठेवून वाशीम जिल्ह्यातील सर्व खदानीची ड्रोनद्वारे मोजणी करून सर्व खदान मालकांकडून त्यांनी चोरी केलेल्या रॉयल्टीची रक्कम दंड व्याजासह वसूल करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी जनतेची मागणी आहे.




# अधिकाऱ्याची वसुलीवरच नजर, मुख्यालयी गैरहजर !

### सरकार म्हणते, शासन आपल्या दारी, पण ग्रामविकास अधिकारी तालुक्यावरी

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

ग्रामविकास अधिकारी हा गाव आणि सरपंच यांच्यातील विकासात्मक दुवा समजला जातो. मात्र, रिसोड पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत मधील एकही ग्राम विकास अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याने गाव विकासाला खीळ बसली आहे. बरेचशे ग्राम विकास अधिकारी तालुक्याच्या ठिकाणावरून, तर काही विकास अधिकारी जिल्ह्याच्या ठिकाणावरून अप डाउन करीत आहेत. त्यामुळे गावचा विकास कसा होणार, असा सवाल गावकरी करीत आहेत.



मात्र, ग्राम विकास अधिकारी गावाला पूर्ण वेळ देण्यासाठी काय प्रयत्न करतात, हे मात्र कोरडेच आहे. केंद्र राज्य शासनाच्या सर्व कल्याणकारी योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जातात. या सर्व योजना गावातील सर्व घटकापर्यंत सर्वकाळ उपलब्ध होतील असे शासनाकडून पाहिले जाते. यासाठी जिल्हा परिषदेमार्फत नियुक्त केलेल्या ग्राम विकास अधिकारी मुख्यालयी राहणे बंधनकारक केले. मात्र मुख्यालयी राहात असल्याचे खोटे दाखले सादर करीत असतात. गाव पातळीवर ग्राम विकास अधिकारी यांना गावाच्या सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने मुख्यालय राहणे बंधनकारक असल्याचा ग्रामविकास विभागाने धोरणात्मक निर्णय सुद्धा घेतला आहे. ग्राम विकास अधिकारी यांच्याकडून शासन नियमाची पायमल्ली केली जात आहे.

याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. त्यांच्यामुळे गावातील सांडपाण्याची व्यवस्था, विजेची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, यासारख्या अनेक समस्यावर योग्य उपाय योजना करण्यात ते अपयशी ठरतात. त्यामुळे आजही अनेक गावात योग्य मूलभूत सोयी सुविधेचा अभाव आहे. ग्राम




विकास अधिकारी मुख्यालयी राहात नसल्याने नागरिकांचे कामे वेळेत होत नाहीत. कशातच एका ग्राम विकास अधिकारी यांच्याकडे तीन-तीन गावचा पदभार आहे. परिणामी नागरिकांना एकच कामासाठी अनेक वेळा हेलपाटे मारावी लागतात. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे.

## वरून उन्हाचा चटका, साईट बंदचा फटका

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी पिक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याच्या तयारीत असताना सातबारा, फेरफार आणि ८-अ उताऱ्यांसाठीची ऑनलाइन साईट वारंवार बंद पडत असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. परिणामी, शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांची सरकारी कार्यालये आणि सेतू केंद्रांवर वणवण सुरू असल्याचे चित्र आहे.

खरेदी-विक्री व्यवहार, बँकिंग प्रक्रिया तसेच पिक कर्जासाठी सातबारा अत्यावश्यक दस्तऐवज मानला जातो. मात्र, साईट दिवसभर सुरू-बंद होत असल्याने अनेकांचे व्यवहार रखडले आहेत. विशेष म्हणजे, सेतू केंद्रांवर रात्री उशिरा साईट सुरू होत असल्याची माहिती समोर येत असून, पहाटेच्या सुमारास ती पुन्हा बंद होते. कार्यालयीन वेळ सकाळी १० ते सायंकाळी ६ अशी असताना नागरिकांनी रात्री कागदपत्रांची पूर्तता करावी का, असा प्रश्न उपस्थित केला




### सातबाऱ्यासाठी नागरिकांची धावपळ

जात आहे. दरम्यान, या तांत्रिक अडचणींचा थेट परिणाम शेतीच्या कामांवर होण्याची भीती व्यक्त होत असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सातबारा काढण्यासाठी तलाठी यांच्याकडे व सेतू केंद्रावर फेऱ्या मारत आहोत. साईट बंद असल्याचे सांगितले जाते. पिककर्ज काढण्यासाठी अडचण निर्माण झाली ति लवकरात लवकर दुर करण्यात यावी.

**शंकर मोरे, शेतकरी**

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# गाजीपूर अपघातातील मृत महिलांवर काशीमध्येच होणार अंत्यसंस्कार !

**धामणगाव बढे:** उत्तर प्रदेशातील गाजीपूर जिल्ह्यातील नंदगंज परिसरात ९ एप्रिल रोजी झालेल्या भीषण बस अपघातातील मृत दोन महिला भाविकांवर काशी येथेच अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय प्रशासन व नातेवाईकांच्या संमतीने घेण्यात आला आहे. जखमी भाविकांच्या उपचारांवरही लक्ष केंद्रित करण्यात आले असून, बहुतांश भाविक ११ एप्रिलपासून परतीच्या प्रवासाला निघणार आहेत. 'जय श्रीराम टूर्स अँड ट्रॅव्हल्स'तर्फे आयोजितकाशी-अयोध्या-पशुपतिनाथ यात्रेसाठी रोहिणखेड व धामणगाव बढे परिसरातील सुमारे ९१ भाविक ३१ मार्च रोजी रवाना झाले होते. नेपाळहून परतत असताना वाराणसी-गोरखपूर महामार्गावर झालेल्या अपघातात मोताळा तालुक्यातील सरस्वतीबाई पाखरे व अकोला जिल्ह्यातील अन्नपूर्णाबाई यांचा जागीच मृत्यू झाला. सुमारे ३८ भाविक जखमी झाले असून, तिघांची प्रकृती चिंताजनक होती.

# डिजेच्या तालावर नव्हे, विचारांच्या प्रकाशात जयंती साजरी करा– पाटील

## शहर पोलिस स्टेशनमध्ये शांतता समितीची बैठक

प्रतिनिधी ११ एप्रिल

**खामगाव :** भारतामधील विविध जाती धर्म एकत्र नांदण्यामागे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाची मोठी ताकद आहे. मात्र, आजच्या पिढीपर्यंत महापुरुषांचा त्याग आणि विचार पोहोचत नाहीत, ही चिंतेची बाब आहे. डीजेच्या तालावर नाचून नव्हे तर महापुरुषांचे विचार वाचून आणि आचरणात आणून जयंती साजरी करणे हीच खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांनी येथे केले. स्थानिक शहर पोलिस स्टेशनमध्ये आयोजित शांतता समितीच्या सभेत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करताना सामाजिक सलोखा, शिस्त आणि जबाबदारी यांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचा ठाम संदेश शांतता समितीच्या बैठकीतून देण्यात आला. शहर पोलिस स्टेशन येथे पार पडलेल्या या बैठकीत मिरवणुकीचे नियोजन, वाहतूक व्यवस्था, बंदोबस्त आणि सार्वजनिक शिस्त यावर सविस्तर चर्चा झाली. सभेला शिवाजीनगर पोलिस स्टेशनचे निरीक्षक सुरेंद्र अहेरकर, पितांबर जाधव, खामगाव ग्रामीण पोलिस स्टेशनचे ठाणेदार किशोर तावडे, निमिष मेहेत्रे, पिंपळगाव राजा पोलिस स्टेशनचे ठाणेदार भागवत मुळीक यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शरद वसतकार, प्रवीण कदम, अॅड. अमोल अंधारे, नितीन सूर्यवंशी, दादाराव हेलोडे, धम्मपाल नितनवरे आदींनीही विचार मांडले.प्रसाद तोडकर यांनी तानाजी

व्यायामशाळेच्या वतीने आयोजित क्रिकेट स्पर्धेबाबत माहिती देत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन निरीक्षक रामकृष्ण पवार यांनी केले. बैठकीस

विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सण, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने उत्सव समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

# तरुणासह काकावर लोखंडी रॉडने हल्ला; संताप उसळला

प्रतिनिधी ११ एप्रिल

**खामगाव :** शहरानजीकच्या घाटपुरी परिसरात फिरकोळ कारणावरून उफाळलेल्या हिंसाचाराने कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे सायंकाळी समोर आले आहे. शेजारील मुलीशी संवाद साधल्याच्या क्षुल्लक कारणावरून तरुणावर जीवघेणा हल्ला करण्यात आला, इतकेच नव्हे तर त्याला वाचवण्यासाठी धावून आलेल्या काकालाही बेदम मारहाण करण्यात आल्याने परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

फिर्यादी गणेश हरसिंग सोळंके यांच्या भाच्याने शेजारी राहणाऱ्या मुलीशी बोलल्याच्या कारणावरून आरोपींनी आक्रमक भूमिका घेतली. तू तिच्याशी का बोलतो? असा जाब विचारत शिवीगाळ सुरू झाली आणि काही क्षणातच हा वाद थेट मारहाणीपर्यंत पोहोचला. यानंतर आरोपींनी संतापाच्या भरात तरुणावर लाठीकाठ्यांनी तुटून पडत्त निर्दयी मारहाण केली. हा प्रकार पाहून त्याला वाचवण्यासाठी पुढे सरसावलेल्या सोळंके यांनाही आरोपींनी सोडले नाही. उलट त्यांच्यावरही लाठीकाठचा आणि लोखंडी रॉडने हल्ला करत हात-पायांवर जबर मारहाण करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे सावट पसरले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात १० एप्रिलच्या पहाटे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणात एका अल्पवयीन आरोपीचा समावेश आहे. अल्पवयीन आरोपींसह तिघांविरोधात पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, या घटनेचा तपास पोलीस हवालदार दिनेश घुगे करत आहेत.

# महावीर वस्तीत हिंदू संमेलन उत्साहात साजरे

प्रतिनिधी ११ एप्रिल

**खामगाव :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त सकल हिंदू समाजाच्या वतीने महावीर वस्तीत प्रेम लॉन येथे हिंदू संमेलन उत्साहात पार पडले. संमेलनाला प्रमुख वक्ते विदर्भ प्रांत सह व्यवस्था प्रमुख रुपेश शाह, चेतन महाराज (प्रमुख धर्माचार्य, शाक्त सखी परंपरा, अकोला), श्रद्धादीदी मोहन मिश्रा तसेच हिंदू संमेलनाचे अध्यक्ष भारत गणेश चौकसे व्यासपीठावर उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते गोमाता, भारत माता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून संमेलनाची सुरुवात करण्यात आली.

या वेळी प्रमुख वक्ते रुपेश शाह यांनी आपल्या मार्गदर्शनात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त हिंदू समाज संघटित




व्हावा तसेच सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, कुटुंब प्रबोधन, स्वावलंबी जीवनशैली आणि नागरिक कर्तव्ये या पंचपरिवर्तनांचा अंगीकार करण्याची गरज असल्याचे सांगितले.

आशीर्वचन देताना चेतन महाराज यांनी स्त्री ही महिषासुरमर्दिनीचे रूप असून तिच्यात अपार सामर्थ्य आहे, असे सांगत धर्म आणि शिवपुराणातील मूल्यांबाबत समाजात जागृती करण्याचे आवाहन केले. महिला वक्त्या श्रद्धादीदी मिश्रा यांचेही मार्गदर्शन लाभले.

संमेलनापूर्वी भारतमाता व रामदरबाराच्या देखाव्याची भव्य शोभायात्रा परिसरातून काढण्यात आली. या शोभायात्रेत महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. मिरवणुकीत ‘ऑपरेशन सिंदूर’ राफेल देखावा विशेष आकर्षण ठरला. कु. प्रिया कापडे व कु. पूर्वा खंडारे यांनी तलवार व लाठी-काठीचे प्रात्यक्षिक सादर केले. रणधुरंधर प्रतिष्ठानतर्फे ‘आदर स्त्रीत्वाचे’ ही नाटिका सादर करण्यात आली. संमेलनाला जिल्हा संघचालक बाळासाहेब काळे, नगर संघचालक प्रल्हाद निमकंडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मुस्कान छतवाणी यांनी केले तर आभार प्रदर्शन समितीचे सचिव गणेश परदेशी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता भारतमातेच्या सामूहिक आरतीने करण्यात आली.

# एमआयडीसीतील कंपनीत रासायनिक आपत्ती मॉक ड्रिल

प्रतिनिधी ११ एप्रिल

**खामगाव :** रासायनिक अपघातांच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थितीत कर्मचाऱ्यांची तयारी व प्रतिसाद क्षमता तपासण्यासाठी ९ एप्रिल रोजी एमआयडीसीतील एका खासगी कंपनीत मॉक ड्रिल घेण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार 'रासायनिक अपघात (आपत्कालीन परिस्थिती, योजना, तयारी व प्रतिसाद) नियम, १९९६' अंतर्गत सकाळी ११:४५ वाजता ही ड्रिल पार पडली.

एरोसोल उत्पादन करणाऱ्या या कंपनीत एलपीजी व इथेनॉलचा वापर होतो. ड्रिलदरम्यान मटेरियल गेटजवळ एलपीजी टँकरमधून गॅस गळती होऊन आग लागल्याची व संभाव्य स्फोटाची परिस्थिती गृहीत धरण्यात आली. या स्फोटाचा परिणाम सुमारे ३०० मीटर परिसरावर होऊ शकतो, असे दृश्य





## प्रतिसाद क्षमतेची चाचणी

तयार करण्यात आले होते. आपत्कालीन सायरनद्वारे १६७ कर्मचाऱ्यांना सतर्क करण्यात आले. कर्मचाऱ्यांना सुरक्षित मार्गाने असेंब्ली पॉइंटवर हलविण्यात आले. अनावश्यक वाहनांवर नियंत्रण, मोबाइल वापरावर निर्बंध तसेच परिसरातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्याची कार्यवाही करण्यात आली. फायर फायटिंग टीमने आग नियंत्रणात आणली, तर फर्स्ट एड टीमने जखमींना तत्काळ उपचार दिले.तसेच वाहतूक नियंत्रणासाठी एनसीसी १३ महाराष्ट्र बटालियनचे पथकही सहभागी झाले. कंपनीच्या व्यवस्थापनातर्फे मिलिंद वैद्य, राजेश सिन्हा, बी. ए. शेळके, अतुल सकळकले यांनी समन्वय साधला. ड्रिलनंतर प्रक्रियेचा आढावा घेऊन सुधारणा सुचवण्यात आल्या. या उपक्रमामुळे आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता वाढल्याचे स्पष्ट झाले.या ड्रिलला बुलढाणा येथील सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन गजानन धिरके, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य उपसंचालक अमर भोगे, नायब तहसीलदार सोनाली भाजीभाकरे, शिवाजी नगर पोलिस स्टेशनचे निरीक्षक सुरेंद्र आहेरकर, नगरपालिका अग्निशमन अधिकारी नरेश रोठे आणि एमआयडीसी महावितरण सहा. अभियंता सचिन फेरन यांचा सहभाग होता. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन टीमचे सदस्य गुलाबसिंग राजपूत आणि प्रदीप सोनावणे. जनरल हॉस्पिटलचे डॉ. आढाव तसेच कर्मचारी रुग्णवाहिकेसह उपस्थित होते.

# प्रार्थनास्थळाजवळ दोन गटांत हाणामारी; नऊ जखमी

प्रतिनिधी ११ एप्रिल

**बुलढाणा :** शहरातील इकबाल चौक परिसर शुक्रवारी दुपारी अचानक तणावग्रस्त बनला.

प्रार्थनास्थळाजवळ दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी झाली. दुपारी सुमारे २ वाजेच्या सुमारास झालेल्या या घटनेत दगडफेक, काठ्यांचा वापर आणि इतर वस्तूंनी मारहाण करण्यात आली. या घटनेत नऊ जण जखमी झाले असून, त्यांच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, या वादामागे अनेक कारणांची पार्श्वभूमी असल्याचे समोर आले आहे. प्रार्थनास्थळाच्या मौलानांना बदलण्याची मागणी, गायचोरीचा आरोप तसेच ट्रस्टींमधील अंतर्गत वाद यामुळे तणाव निर्माण झाला होता. प्रार्थनेच्या वेळेस हा वाद अचानक उफाळून आला आणि त्याचे रूपांतर थेट हाणामारीत झाले. दोन्ही गटांकडून दगडफेक आणि काठ्यांनी हल्ला करण्यात आल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेत जखमी झालेल्यांमध्ये लहान मुलांचाही समावेश आहे. जखमींमध्ये दानिश कुरेशी नाजीम कुरेशी (१४), शेख साबीर शेख अफसर (४५), शेख मोईन शेख आकीब (२२), शेख उमर शेख जाकीर (२१), शेख आदिब शेख शाबीर (१६), जाकीर शेख अफसर (५०) आणि सैय्यद तौफिस (२८) यांचा समावेश असून, सर्वांवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# तांदुळवाडीत युवकाचे विषप्राशन

प्रतिनिधी ११ एप्रिल

**खामगाव :** पिंपळगाव राजा पोलीस ठाण्यांतर्गत तांदुळवाडी येथे मंगेश सूर्यवंशी (३०) या युवकाने विष प्राशन केल्याची घटना उघडकीस आली. त्याला सकाळी सुमारे ११.३० वाजता खामगाव येथील सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# अल्पवयीन मुलीला धमकी देत गैरवर्तन; पोक्सोखाली गुन्हा

**खामगाव :** खामगाव खामगाव शहरात अल्पवयीन मुलीच्या सुरक्षिततेवरच प्रश्नचिन्ह उभे करणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. केवळ १२ वर्षाच्या मुलीला जीवे मारण्याची धमकी देत तिच्याशी अशोभनीय वर्तन केल्याप्रकरणी एका अल्पवयीन मुलाविरुद्ध कठोर कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे शहरात संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ८एप्रिलच्या रात्री सुमारे साडेआठच्या सुमारास ही घटना शहरातील एका वस्तीमध्ये घडली. आरोपी मुलाने ओळखीचा फायदा घेत मुलीला बोलावून घेतले आणि तिच्याशी गैरवर्तन केले, अणी गंभीर तक्रार नोंदविण्यात आली आहे.

# अधिकाऱ्याला अडवून शिवीगाळ; गुन्हा दाखल

**खामगाव :** जळगाव जामोद तालुक्यातील मानेगाव नवीन गावठाण परिसरात रस्त्यावर मद्यधुंद अवस्थेत गोंधळ घालत शासकीय अधिकाऱ्याला अडवून शिवीगाळ केल्याची घटना १० एप्रिल रोजी घडली. याप्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी दोघांविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी डॉ. सुनील संपतराव तळोकर (४९, पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती, जळगाव जामोद) हे मित्रासह चारचाकी वाहनाने खांडवीकडे जात होते.दि. १० एप्रिल रोजी दुपारी सुमारे ३:३० वाजताच्या सुमारास मानेगाव नवीन गावठाण येथे आरोपी अभिमन्यू प्रल्हाद चोपडे (३०) व कुलदीप चतरसिंग राजपूत (३०, दोन्ही रा. मलकापूर) यांनी मोटारसायकल वाहनासमोर उभी करून त्यांना अडवले. यानंतर दोन्ही आरोपींनी रस्त्यावर आरडाओरड करत फिर्यादी व त्यांच्या मित्रास शिवीगाळ केली. वैद्यकीय तपासणीत आरोपी मद्यधुंद अवस्थेत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

# ऐतिहासिक सुवर्णक्षण ; उपराष्ट्रपती भवनात घुमला सिंधी भाषेचा जयघोष

## ♦ संविधानाच्या सिंधी आवृत्तीचे दिमाखदार विमोचन ! ♦ अकोल्याचे सिंधी समाज शिष्टमंडळ राजधानीत









प्रतिनिधी ११ एप्रिल

**नवी दिल्ली :** भारतीय लोकशाहीचा सर्वोच्च ग्रंथ असलेल्या 'भारतीय संविधानाचे' आता सिंधी भाषेतही अधिकृत विमोचन झाले असून, या अभूतपूर्व ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्याचा बहुमान अकोल्यातील सिंधी समाजाला मिळाला आहे. सिंधी भाषा दिनाचे औचित्य साधून उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या शुभहस्ते उपराष्ट्रपती भवनात हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे अकोल्यातील मान्यवरांचे कणखर नेतृत्व. माजी नगराध्यक्ष आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते हरिशभाई आलिमचंदानी यांच्या मार्गदर्शनाखाली अकोल्याच्या शिष्टमंडळाने या राष्ट्रीय सोहळ्यात आपली उपस्थिती नोंदवून जिल्ह्याची मान उंचावली. अकोल्याचे युवा खासदार अनुप धोत्रे यांची विशेष उपस्थिती या सोहळ्याला अधिकच वजन देऊन गेली. सिंधी भाषेतील हे संविधान देवनागरी आणि फारसी अशा दोन्ही लिपींमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे, जेणेकरून भाषेचा वारसा जपला जाईल.'सिंधी समाज हा संघर्षातून उभा राहिलेला समाज आहे. फाळणीनंतर विखुरलेल्या या समाजाला त्यांच्या मातृभाषेनेच एकत्र बांधून ठेवले,' अशा शब्दांत उपराष्ट्रपतींनी कौतुक केले. मातृभाषेत संविधान आल्याने सिंधी समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत लोकशाहीची मूल्ये पोहोचण्यास मदत होईल.

सिंधी भाषा दिनाचे औचित्य साधून भारताचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते उपराष्ट्रपती भवनात भारतीय संविधानाच्या सिंधी भाषेतील अधिकृत आवृत्तीचे अत्यंत दिमाखदार सोहळ्यात विमोचन करण्यात आले. सिंधी समाजाच्या इतिहासात हा क्षण सुवर्णअक्षरांनी कोरला जावा असा ठरला असून, या ऐतिहासिक प्रसंगी अकोल्यातील सिंधी समाजाच्या शिष्टमंडळाने विशेष उपस्थिती दर्शवली.

### भाषेचा वारसा आणि लोकशाहीचा सन्मान

विमोचित करण्यात आलेली संविधानाची ही आवृत्ती देवनागरी आणि फारसी अशा दोन्ही लिपींमध्ये प्रकाशित करण्यात आली आहे. यावेळी उपराष्ट्रपतींनी आपल्या भाषणात सिंधी समाजाच्या संघर्षाचा आणि जिद्दीचा गौरव केला. फाळणीच्या वेदना सहन करणाऱ्या सिंधी समाजाला त्यांच्या मातृभाषेनेच एकत्र ठेवले आणि त्यांची ओळख टिकवून ठेवली, असे प्रतिपादन त्यांनी केले. मातृभाषेत संविधान उपलब्ध झाल्यामुळे लोकशाही प्रक्रियेत सामान्य नागरिकांचा सहभाग आणि विश्वास अधिक वृद्धिंगत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### अकोल्यातील सिंधी बांधवांची उपस्थिती

या कार्यक्रमाला केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल, राजस्थान विधानसभेचे अध्यक्ष वासुदेव देवनानी, आणि खासदार शंकर लालवानी यांच्यासह अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वे उपस्थित होती. अकोला सिंधी समाजाच्या या सहभागामुळे या कार्यक्रमाची शोभा द्विगुणित झाली असून, हा क्षण संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाचा विषय ठरला आहे. अकोल्यातून माजी नगराध्यक्ष व अध्यक्ष, अकोला थॅलेसेमिया सोसायटी हरिशभाई आलिमचंदानी,सिंधी जनरल पंचायत चे अध्यक्ष रमेशभाई जग्यासी,विनोद मनवानी,कन्हैयालाल रंगवानी,सुरेशसेठ संतानी,हरीशभाई कटारिया, कन्हैयालाल आहुजा,कमल आलिमचंदानी,इंजि. संदीप आलिमचंदानी (युवा प्रतिनिधी) यांची उपस्थिती होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# हॉटेल व्यवसायिकांना दिलासा, नागरिकांचे काय ?

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अकोला :** एकीकडे शहरात उन्हाळ्याच्या झळांनी अंगाची लाहीलाही होत आहे, तर दुसरीकडे शहरातील घरगुती गॅस ग्राहकांसाठी गॅस एजन्सीच्या पायऱ्या चढणे हा उन्हापेक्षाही दाहक अनुभव ठरू लागला आहे. जिल्ह्यात व्यावसायिक सिलिंडरचा ४० टक्के पुरवठा सुरू झाल्याने हॉटेल व्यावसायिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला असला, तरी दुसरीकडे घरातील चूल पेटवण्यासाठी धडपडणाऱ्या सर्वसामान्य ग्राहकांना मात्र गॅस एजन्सीच्या मनमानीचा आणि अरेरावीचा सामना करावा लागत आहे. गॅस एजन्सी धारकांवर प्रशासनाचा वचक आहे की नाही? अशी भीती वाटण्यासारखी परिस्थिती आज शहरात निर्माण झाली आहे.

घरगुती गॅस मिळवणे हा आता केवळ प्रक्रियेचा भाग राहिला नसून, तो एक मानसिक त्रास झाला आहे. रेशनिंग आणि नियम कडक झाल्याचा बहाणा करत गॅस एजन्सींकडून ग्राहकांची सर्रास अडवणूक केली जात आहे. तासनतास रांगेत उभे राहूनही हक्काचा सिलिंडर मिळवण्यासाठी नागरिकांना एजन्सीचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. विशेषतः गृहिणी आणि वृद्ध नागरिकांचे यामुळे मोठे हाल होत असून, प्रशासकीय यंत्रणा याकडे डोळेझाक करत असल्याचे चित्र दिसत आहे.

सिलेंडर बुक न केल्यावरही, व सिलेंडर न मिळाल्यावरही येत आहेत डिलिव्हरीचे मेसेज अनेक नागरिकांनी सिलेंडर बुक न केल्यावरही तसेच घरपोच डिलिव्हरी न मिळाल्यावरही त्यांना डिलिव्हरीचे मेसेज येत आहेत या नागरिकांचे सिलेंडर परस्पर विकून हजारो रुपये कमविले जात आहेत तर दुसरीकडे या नागरिकांच्या खात्यात मात्र केवळ ४ रुपये २१ पैसे सबसिडी जमा होत आहे. याबाबत तक्रार केल्यानंतर तांत्रिक चूक झाल्याचा बहाना बनविला जात आहे

- सिलेंडर बुक न केल्यावरही, डिलिव्हरी दिल्याचे मेसेज
- नागरिकांचे सिलेंडर विकून हजारो ची कमाई
- नागरिकांच्या खात्यात केवळ चार रुपयांची सबसिडी



### एजन्सी की अन्याय केंद्र ?

शहरातील अनेक गॅस एजन्सीवर गेल्यास तिथे ग्राहकांशी अत्यंत उद्धटपणे वागले जात असल्याच्या तक्रारींचा पाऊस पडत आहे. हक्काचा सिलिंडर मागण्यासाठी गेलेल्या ग्राहकांना नीट उत्तरे न देणे, तांत्रिक अडचणींचे खापर ग्राहकांवरच फोडणे आणि जाब विचारल्यास अंगावर धावून जाणे असे प्रकार नित्याचे झाले आहेत. महिलांना आणि ज्येष्ठांना बसण्यासाठी साधी सोयही केली जात नाही. उद्या या किंवा काम होणार नाही, असे सांगून ताटकळत ठेवलेल्या नागरिकांना रिकाम्या हाती परत पाठवले जाते. यात ग्राहकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात असून, एजन्सी चालकांच्या या मुजोरीला लगाम घालणारा कोणीही उरला नाही का, असा सवाल आता संतप्त नागरिक विचारत आहेत.

### प्रशासन ढिम्म का?

नागरिकांच्या मते व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा सुरू करण्यासाठी तातडीने हालचाली होतात, मग घरगुती ग्राहकांच्या रांगा कमी करण्यासाठी प्रशासन ढिम्म का? तक्रार करूनही अधिकारी केवळ बघू पाहू अशी उत्तरे देत आहेत.

# समृद्धी महामार्गावर तीन कारचा विचित्र अपघात !

## दोन गंभीर, पाच जखमी

प्रतिनिधी ११ एप्रिल




**बुलडाणा :** समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून, काल सायंकाळी बुलढाण्याच्या मेहकरजवळ एक भीषण तिहेरी अपघात घडला. पहिल्या अपघातानंतर मदतीसाठी धावलेल्या समृद्धी महामार्गाच्या कर्मचाऱ्यांनाच पाठीमागून येणाऱ्या भरधाव वाहनाने धडक दिली. या विचित्र अपघातात २ जण गंभीर जखमी झाले असून ५ जण किरकोळ जखमी आहेत.

मुंबई कॉरिडॉरवरील चॅनेल क्रमांक २९३ जवळ हा अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, एका नेक्सॉन कारने आपल्या समोरील अज्ञात वाहनाला जोराची धडक दिली. या पहिल्या धडकेत नेक्सॉन चालक शशांक खेरणार हे गंभीर जखमी झाले. घटनेची भीषणता पाहून महामार्गावरील सुरक्षा रक्षक आणि मदत पथक तातडीने तिथे पोहोचले. अपघातातील जखमींना बाहेर काढण्याचे आणि मदतकार्य करण्याचे काम सुरू असतानाच मागून येणाऱ्या एका भरधाव 'औरा' कारने तेथे उभ्या असलेल्या 'इनोव्हा' कारला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, इनोव्हा कार पुढे सरकून आधीच अपघातग्रस्त झालेल्या नेक्सॉन कारवर जाऊन आदळली. या दुसऱ्या धडकेत मदतीसाठी थांबलेले ट्रक चालक मोईजोद्दीन शेख हे गंभीर जखमी झाले. एमएसएफचे जवान आकाश मोहाडे, संतोष सोनुने, सचिन आंधळे आणि फायरचे परमेश्वर शिंदे यांना किरकोळ दुखापत झाली. याशिवाय औरा कारमधील अमित बोंडे आणि तेजस वाघोरे हे प्रवासी देखील जखमी झाले आहेत. मात्र, औरा कारचा चालक अक्षय हा अपघातानंतर घटनास्थळावरून फरार झाला आहे.

सर्व ७ जखमींना रुग्णवाहिकेद्वारे मेहकर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती चिंताजनक असल्याने गंभीर जखमींपैकी एकाला जालना तर दुसऱ्याला मुंबई येथे पुढील उपचारासाठी हलवण्यात आले आहे. पोलीस प्रशासनाने क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहने महामार्गावरून बाजूला करून वाहतूक सुरळीत केली आहे. फरार चालकाचा शोध सुरू असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# अकोल्यात महापालिकेच्या जमिनींचा 'मलिदा' कोणाला ?

प्रतिनिधी ११ एप्रिल

- नगरसेवक सुनील इन्नानींचा खळबळजनक आरोप !

**अकोला :** महापालिकेच्या मोकळ्या जागा आणि जमिनींच्या व्यवहारावरून अकोला राजकारण पुन्हा एकदा तापले आहे. वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक सुनील इन्नानी यांनी सत्ताधारी भाजपवर गंभीर आरोप करत, महापालिकेच्या मौल्यवान जमिनींचा 'मलिदा' लाटण्याचा डाव आखला जात असल्याचा दावा केला आहे. या प्रकरणाने १३ एप्रिल रोजी होणाऱ्या महासभेकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. नुकत्याच झालेल्या सभेत सत्ताधारी महापौरांनी विरोधी पक्षाच्या १६ नगरसेवकांना निलंबित केले होते. या कारवाईवर सुनील इन्नानी यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.



'जमिनींच्या व्यवहाराचे मोठे निर्णय घेताना विरोधकांनी अडथळा आणू नये, म्हणूनच हा निलंबनाचा घाट घातला गेला का?' असा गर्भित इशारा त्यांनी दिला आहे. विरोधक नसताना महत्त्वाच्या जमिनींचे ठराव मंजूर करून घेण्याची ही सत्ताधाऱ्यांची 'फिक्सिंग' असल्याचा आरोप आता जोर धरत आहे. येत्या सोमवारी, १३ एप्रिल रोजी होणाऱ्या महासभेत नेमक्या कोणत्या जमिनींच्या विक्रीवर किंवा हस्तांतरावर शिक्कामोर्तब होणार, याबाबत शहरात मोठी उत्सुकता आहे. इन्नानी यांच्या मते, या सभेत गुपचूपपणे काही भूखंडांचे व्यवहार उरकले जाण्याची शक्यता आहे.विरोधी पक्षाचे १६ वाघ सभागृहाबाहेर काढून सत्ताधारी कोणाचे हित साधत आहेत ? अशी विचारणा त्यांनी केली.१६ नगरसेवकांच्या निलंबनानंतर आता १३ एप्रिलची महासभा ऐतिहासिक ठरणार असून, सुनील इन्नानी यांनी उपस्थित केलेले प्रश्न अकोला महापालिकेत नवा भूकंप आणण्याची चिन्हे आहेत.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियानाचा शुभारंभ

प्रतिनिधी ११ एप्रिल

**अकोला :** लोकाभिमुख व पारदर्शी प्रशासनाची दिशा देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा घेऊन सुरू करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकाला न्याय देण्याचे कार्य अखंडपणे होईल, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.


मुर्तीजापुर तालुक्यातील लक्षेश्वर संस्थान लाखपुरी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. आमदार रणधीर सावरकर, हरीश पिंपळे ,वसंत खंडेलवाल,माजी आमदार बळीराम सिरस्कार,लाखपूरी सरपंच राजू कैथवास,




मुर्तिजापूर नगराध्यक्ष हर्षल साबळे,जिल्हाधिकारी वर्षा मीना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे,उपजिल्हाधिकारी महसूल निखिल खेमनार,जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख भारती खंडेलवाल, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मुरलीधर इंगळे,उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार,तहसीलदार शिल्पा बोबडे आदी उपस्थित होते. बावनकुळे म्हणाले की, महाराजस्व अभियान शिबिराच्या माध्यमातून एकाच छताखाली शासनाच्या विविध योजना उपलब्ध करून देण्यात आल्या असून याचा प्रत्येकाने लाभ घेतला पाहिजे.अकोला जिल्ह्यात भूमी अभिलेख विभागाच्या मदतीसाठी १०० खाजगी सर्व्हेअर नियुक्त करण्यात येणार आहे. यामुळे शेती प्लॉट मोजणी जलद गतीने होणार आहे.मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ते योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेत रस्ते टप्प्याटप्प्याने पूर्ण होणार असून दुतर्फा झाडे लावण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्यांना थेट शेतीच्या बांधापर्यंत पोहोचणे शक्य होणार आहे.पट्टेवाटपाचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला असून त्याची नोंदणी केवळ १ हजार रुपयात केली जाईल. आमदार सावरकर म्हणाले की, तुकडे बंदी कायद्यात झालेल्या सुधारणांमुळे आता गुंठेवारी व लहान भूखंडाच्या मालकी हक्कातील अडथळे दूर झाले असून गतिमान प्रशासनामुळे हे शक्य ८ झाले आहे. आमदार पिंपळे म्हणाले की,झोपडपट्टी पुनर्वसन आणि 'सर्वांसाठी घरे' ते स्वप्न महाराष्ट्र शासनाच्या प्रयत्नातून पूर्ण होत असून मालकी हक्काचे पट्टे वाटप व त्याची नोंदणी करण्याबाबत सुद्धा महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला असल्याने हा ऐतिहासिक निर्णय आहे.

# महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावावे

- नगरसेवक आशीष पवित्रकार यांची सभागृहात मागणी




**अकोला :** महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवावे. जेणेकरून वचक राहील तसेच आपल्या प्रभागात आरोग्य केंद्र सुरू करावे हा मुद्दा नगरसेवक आशीष पवित्रकार यांनी आजच्या सभेत उचलून धरला. आपल्या प्रभागात २२ नंबर शाळा आहे. आरोग्य केंद्रासाठी त्या शाळेची रूम वापरत आहे. मागे आरोग्य केंद्र सुरू करण्याविषयी महापालिका प्रशासनाने सांगितले होते. परंतु अद्याप सुरू झाले नाही. आरोग्य केंद्र सुरू झाल्यास प्रभागातील गरजूंची सोय होईल. तसेच महापालिका शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले तर निश्चितच वचक राहील. या महत्त्वाच्या मुद्यावर नगरसेवक आशीष पवित्रकार यांनी आजच्या सभेत प्रकाश टाकला.

# आर.डी.जी. पब्लिक स्कूलचा प्रभावी उपक्रम

प्रतिनिधी ११ एप्रिल

- शार्क पूल स्पर्धेत विद्यार्थ्यांनी कौशल्ये दाखवली

**अकोला :** येथील आर.डी.जी. पब्लिक स्कूलने मुलांची स्वप्ने आणि त्यांच्या व्यावसायिक कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी 'शार्क पूल' नावाचे एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. जी मुले स्वप्ने पाहतात आणि ती सत्यात उतरवण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावतात. त्यांना आपली स्वप्ने साकार करण्याचा हक्क आहे आणि शार्क पूल त्यांची स्वप्ने प्रत्यक्षात उतरवते. आगळा वेगळा अनुभव विद्यार्थी घेत आहेत. शार्क पूल स्पर्धेत एकूण चार फेऱ्या आहेत. पहिल्या फेरीत १४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी झाली, दुसऱ्या फेरीत ४० विद्यार्थ्यांची तिसऱ्या फेरीसाठी निवड करण्यात आली. तिसरी फेरी ६ ते ९ एप्रिल दरम्यान पार पडली. या स्पर्धेत केवळ अकोलाच नव्हे, तर काश्मीर, बरेली, नाशिक, पिलीभीत येथील विद्यार्थ्यांनीही उत्साह दाखवला. यामध्ये मुलांच्या व्यावसायिक कल्पनांचे सादरीकरण इतके उत्कृष्ट होते की परीक्षक आणि प्रेक्षक थक्क झाले.नाशिकमधील विद्यार्थ्यांचा एक गट त्यांनी स्वतः तयार केलेली दुचाकी घेऊन अकोला येथे



दाखल झाला. विद्यार्थ्यांनी बनवलेली दुचाकी दुसऱ्या मजल्यावर नेऊन सर्वांना चकित केले. त्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे परीक्षकांना निर्णय घेणे अवघड झाले. याव्यतिरिक्त, मुलांनी ऑल-इन-वन जिओमेट्रिक पेन, साथ ऑन टाइम, फुटेक इनोव्हेशन, द स्पीअर, सेन्सोटेक, क्लीन स्वीप, हायब्रीड टू-व्हीलर्स आणि एआय एजन्सी यांसारखी उत्कृष्ट सादरीकरणे केली. औद्योगिक क्षेत्रात यश मिळवलेल्या व्यावसायिकांना शार्क पूल स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीसाठी परीक्षक म्हणून आमंत्रित केले होते. त्यांनी सहभागींच्या कल्पनांचे मूल्यांकन केले आणि त्यांना मार्गदर्शनही केले. या स्पर्धेत आर.डी.जी. पब्लिक स्कूलचे संचालक श्री. दिलीपराज गोयनका आणि सौरभ गोयनका यांनी विचार व्यक्त केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले आणि त्यांच्या सादरीकरणासाठी शुभेच्छाही दिल्या. या स्पर्धेची चौथी आणि अंतिम फेरी २० जून २०२६ रोजी होणार आहे. अशा स्पर्धा तरुणांमध्ये स्वावलंबन आणि व्यावसायिकतेच्या भावनेला प्रोत्साहन देतात. सहभागींनी या व्यासपीठाला आपली स्वप्ने साकार करण्याची एक महत्त्वाची संधी असेही म्हटले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आर.डी.जी. पब्लिक स्कूलचे संचालक श्री दिलीपराज गोयनका, सौरभ गोयनका, प्राचार्य कुरियाचन सी.पी., उपप्राचार्य श्वेता चोमवाल यांच्या मार्गदर्शनात इयत्ता नववी आणि दहावीचे विद्यार्थी, शिक्षक मंदार जोशी यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्न केले.

# मारहाण प्रकरणी तिघांविरूध्द गुन्हा दाखल

**बाळापूर :** गेल्या वर्षी भांडणावरून तिघांनी एकास पाईपने मारहाण केल्याप्रकरणी बाळापूर पोलिसांनी ३ जणांविरूध्द गुन्हा नोंदविला आहे.

प्राप्त माहितीनुसार गतवर्षी झालेल्या भांडणा वरून ८ एप्रिल रोजी वाद घालून फिर्यादीच्या मुलास सार्वजनिक ठिकाणी मारहाण करून जखमी केले. या प्रकरणी शालिनी कैलास उमाळे यांच्या फिर्यादीवरून चंदन बावणे, गोलू सुरजूसे, अक्षय सुरजूसे यांच्या विरूध्द बाळापूर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. बाळापूर पोलिस तपास करीत आहेत.




# देशमुख महिला मंडळ अकोलाचा सामाजिक उपक्रम






प्रतिनिधी ११ एप्रिल

**अकोला :** देशमुख महिला मंडळकडून दर महिन्याला सामाजिक उपक्रम राबविला जातो.

या महिन्यात ही जबाबदारी 'इरकल' ग्रुपकडे होती. अकोल्यातील उन्हाचा तडाखा सर्वांनाच बसत असतो,पण कितीही उन असल तरी पोटाची खळगी भरण्यासाठी गरजू लोक रस्त्यावर फळ,भाजी विकायला बसतात. त्यांना थोडासा दिलासा म्हणून मंडळाकडून त्यांना मोठ्या छत्र्यांचे वाटप करण्यात आले. जवाहर नगर चौकात बसणारे छोट्या व्यावसायिकांची निवड केली. यावेळी मंडळाच्या अध्यक्षा राजेश्री ताई , सचिव स्वप्नाली ताई , जेष्ट सल्लागार कविता ताई ढोरे उपस्थित होत्या .तसेच 'इरकल' ग्रुप लिडर वर्षा , सुजाता , वंदना , ज्योती , उज्वला संदीप , निता , उज्वला योगेश , प्रमिला , वासंती , कविता , शितल, शुभांगी ह्या उपस्थित होत्या.







हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK